POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२१८ ● मुंबई, गुरुवार, १२ मार्च २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA



### मुंबईत वडापावही मिळणार नाही

इराण आणि इस्त्रायल युद्धामुळे आखाती देशातून होणाऱ्या कच्च्या तेलाच्या पुरवठ्याला फटका बसला आहे. त्यामुळेच व्यावसायिक गॅसची टंचाई निर्माण झाल्याचा फटका पावनिर्मितीलाही बसणार आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मुंबईतील कोळशावर चालणाऱ्या बेकऱ्या स्वच्छ इंधनावर म्हणजेच एलपीजी गॅसवर परावर्तित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे नव्याने रुपांतरित झालेल्या या बेकऱ्या आता गॅस टंचाईमुळे संकटात सापडल्या आहेत. जुन्या भट्ट्याही तोडून टाकल्यामुळे येत्या एक दोन दिवसांत पावही मिळणे मुश्कील होणार आहे. त्यामुळे वडापाव, बनमस्का हे पदार्थ देखील मुंबईकरांना मिळणे अवघड होणार आहे.

## युद्धाचा पहिला मोठा झटका भारताच्या हॉटेल व्यवसायाला

# हॉटेल पाठोपाठ लग्न कार्यांचे हॉल बंद होणार?

■ **बातमी /लेख,प्रीती दिपक नाईक**

इराण इस्त्रालय युद्धाचा पहिला झटका भारताच्या हॉटेल व्यवसायाला बसला आहे. इराण-इस्रायल युद्धामुळे भारतात गॅस पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. भारतात गॅसचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे याचा थेट परिणाम हॉटेल व्यवसायावर झाला आहे. पुणे, नाशिक, मुंबईत दोन ते चार दिवस टीकेल एवढाचा गॅसचा साठा आहे, त्यामुळे परिस्थिती नियंत्रणात न आल्यास हॉटेल बंद होण्याची शक्यता आहेत. ठाण्यातील 70 टक्के हॉटेल आणि, लग्न कार्यकांचे हॉल बंद होण्याची शक्यता आहे. नॅशनल रेस्टॉरंट असोसिएशनने पेट्रोलियम मंत्र्यांना पत्र लिहित पुरवठा सुरू ठेवण्याची मागणी केली आहे. तसंच गॅसची साठेबाजी करू नये म्हणून सरकारनंही काही नवे नियम लागू केले आहेत.

**ठाण्यातील 70 टक्के हॉटेल आणि लग्न कार्यालयांचे हॉल बंद होणार?**

अमेरिका-इस्रायल-इराण युद्धाची फटका भारतातल्या हॉटेल व्यावसायिकांनी बसला आहे. बंगळुरुतली हॉटेल्स बंद ठेवली जाणार आहेत. हॉटेल असोसिएशनं या संदर्भात नोटीस जारी केली आहे. व्यावसायिक वापरासाठीच्या गॅस सिलेंडरचा पुरवठा खंडित झाला आहे. त्यामुळे हॉटेल, रेस्टॉरंट बंद ठेवली आहेत. ठाण्यात उद्या हॉटेल मालकांची महत्त्वाची बैठक होणार आहे. वर्तकनगरमधील कल्पवृक्ष हॉटेलमध्ये बैठक पार पडणार आहे. 'छढऋ गॅसच्या तुटवड्यावर तोडगा न निघाल्यास '70 % हॉटेल आणि लग्न कार्यालयांचे हॉल रविवारपर्यंत बंद होणार. सरकारने मार्ग काढावा याबाबत ठाण्यातील हॉटेल मालक चर्चा करणार.

**मुंबई, पुणे, नाशिक, नागपूरमधील हॉटेल व्यावसायिकांवर परिणाम**

गॅस पुरवठ्यात तुटवडा निर्माण झाल्यानं राज्यातील हॉटेल व्यावसायिकांना देखील मोठा फटका बसतोय. मुंबई, पुणे, नाशिक, नागपूरमधील हॉटेल व्यावसायिकांवर परिणाम होतोय. पुण्यात दुपारनंतर हॉटेल बंद ठेवण्याची वेळ हॉटेल व्यावसायिकांवर आलीय. नाशिकच्या एका हॉटेलमध्ये दिवसाला दोन ते तीन सिलेंडर लागतात मात्र सिलेंडरचा पुरवठा होऊ शकला नसल्याने दोन दिवस पुरेल इतका साठा आहे. मात्र त्यानंतर हा साठा उपलब्ध होणार नसल्याने हॉटेल व्यवसाय बंद करण्याची वेळ हॉटेल व्यवसायिकांवर आलेली आहे.



# एमबीएमसीचा अर्थसंकल्प सादर

■ **भाईंदर। प्रतिनिधी,**

मिरा -भाईंदर महापालिकेचा सन २०२६-२७ साठीचा शासन निधी वगळून १ हजार ४३९ कोटींचा अर्थसंकल्प १५ कोटी २२ लाखांच्या 28 हजार शिल्लकीसह मंगळवारी महापालिका आयुक्त राधा बिनोद शर्मा यांनी स्थायी समिती सभापती हसमुख गेहलोत यांच्यासमोर सादर केला. मागील वर्षी एकत्रित सादर करण्यात आलेला एकूण अर्थसंकल्प जवळपास २ हजार ६९४ कोटी इतका होता.

यंदा अर्थसंकल्पातून वगळण्यात आलेला २ हजार ५७६ कोटी शासन निधी, कर्ज 445 कोटी 98 लाख आणि महानगरपालिका निधी मिळून ४ हजार ४६१ कोटी इतका एकूण अर्थसंकल्प झाला असून गतवर्षाच्या तुलनेत यंदाच्या अर्थसंकल्पात १ हजार ७८७ कोटी रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे इतिहासात पहिल्यांदाच फुगवलेल्या आकड्यांशिवाय मूळ रकमेचा अर्थसंकल्प महापालिकेकडून सादर करण्यात आला असल्याची चर्चा रंगली आहे.

मागील सलग तीन वर्षे महापालिकेत प्रशासकीय राजवट होती. त्यामुळे कोणत्याही चर्चेविना प्रशासनाने सादर केलेला अर्थसंकल्प मंजूर होत होता. दरम्यान दोन महिन्यांपूर्वी महापालिका निवडणुका पार पडल्यापासून लोकप्रतिनिधी निवडून आले आहेत. त्यामुळे यंदा प्रशासनाने हा अर्थसंकल्प स्थायी समितीपुढे सादर केला असून त्यावर सविस्तर चर्चा करून यास १६ मार्च रोजी महासभेत अंतिम मान्यता दिली जाणार आहे.

**महत्वाच्या खचार्ची तरतूद**

- सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मार्फत दैनंदिन साफ व नालेसफाई यांच्याकरिता झ २१४ कोटी २९ लाख
- घनकचरा व्यवस्थापन झ ५० कोटी ३७ लाख
- पाणी पुरवठा २५ कोटी ९३ लाख
- महिला बालकल्याण विभाग झ २८ कोटी ४९ लाख
- अंध व दिव्यांग विभाग झ २८ कोटी ४९ लाख
- दुर्बल घटक योजना झ २८ कोटी ४९ लाख व
- नगररचना विभाग झ ४२ कोटी ४५ लाख
- शिक्षण विभाग झ ३५ कोटी २८ लाख
- वैद्यकीय आरोग्य विभाग झ ६० कोटी ३९ लाख
- संगणक विभाग झ १५ कोटी ३९ लाख
- उद्याने विकास खर्च झ ५३ कोटी ८७ लाख
- परिवहन सेवा झ ३५ कोटी
- विद्युत विभाग झ ६० कोटी ७५ लाख
- बांधकाम विभाग झ २४३ कोटी ३७ लाख
- आस्थापना विभाग कर्मचारी पगारासाठी झ ५५ कोटी ३५ लाख
- पाणीपुरवठा विभाग झ २५९ कोटी ३१ लाख
- पर्यावरण साठी झ १० कोटी ३० लाख

# सरकारने १०, २० आणि ५० रुपयांच्या नोटांसंदर्भातील दिली मोठी बातमी

■ **नवी दिल्ली। प्रतिनिधी,**

देशातील चलनात १०, २० आणि ५० रुपयांच्या नोटांचा तुटवडा आहे का असा प्रश्न अनेकांना पडला आहे. रोखीचे व्यवहार करताना अनेक वेळा सुट्या पैशांची चणचण भासत होती. सुट्या पैशांची मागणी सर्रास होत होती. त्यात १०, २० आणि ५० रुपयांच्या नोटां नाहीत असचं सांगितलं जात होतं. त्यामुळे खरोखर देशात या नोटांचा तुटवडा किंवा चणचण आहे का असा खरा प्रश्न होता. या चर्चांना आता केंद्र सरकारने पूर्णविराम दिला आहे. बाजारपेठेत कमी मूल्याच्या नोटांची कोणतीही कमतरता नसल्याचे सरकारने मंगळवारी राज्यसभेत स्पष्ट केले आहे.

केंद्रीय वित्त राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी संसदेत माहिती दिली की, भारतीय रिझर्व्ह बँकेकडून (फ्इक) नोटांचा पुरवठा सुरळीत सुरू आहे. चालू आर्थिक वर्षात २६ फेब्रुवारीपर्यंत १० रुपयांच्या ४३९.४० कोटी नोटा, २० रुपयांच्या १९३.७० कोटी आणि ५० रुपयांच्या १३०.३० कोटी नोटा वितरित करण्यात आल्या आहेत. मागील आर्थिक वर्षात (२०२५) हा आकडा १० रुपयांच्या १८० कोटी, २० रुपयांच्या १५० कोटी आणि ५० रुपयांच्या ३०० कोटी नोटा इतका होता. अशी माहिती त्यांनी राज्यसभेत दिली.

कमी मूल्याच्या नोटा परंपरेने



एटीएमद्वारे दिल्या जात नाहीत, असे आरबीआयने स्पष्ट केले आहे. मात्र, या नोटांच्या सुलभ वितरणासाठी एका 'पायलट प्रोजेक्ट'ची सुरुवात करण्यात आली असून, याद्वारे छोट्या मूल्यवर्गाच्या वितरकांकडून या नोटा जनतेपर्यंत पोहोचवल्या जात आहेत असं ही स्पष्ट करण्यात आलं आहे. त्यामुळे या नोटांचा चलनात तुटवडा असल्याची बाब फेटाळून लावण्यात आली आहे. शिवाय त्या मुबलक प्रमाणात चलनात आहे हे स्पष्ट करण्यात आलं आहे.

नोटांसोबतच नाणी आणि डिजिटल पेमेंटमुळे दैनंदिन व्यवहारांची गरज पूर्ण होत आहे. रुपे केसीसी कार्डच्या माध्यमातून ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ३.७२ लाख डिजिटल व्यवहार झाले आहेत. त्यांची किंमत १११.१ कोटी रुपये इतकी आहे. लहान नोटा सहसा एटीएममध्ये उपलब्ध नसतात. ही अडचण दूर करण्यासाठी सरकारने एक नवा प्रयोग (पायलट प्रोजेक्ट) हाती घेतला आहे. यामुळे छोट्या वितरकांमार्फत या नोटा थेट लोकांपर्यंत पोहोचतील. तसेच, वाढत्या डिजिटल पेमेंटमुळेही रोख रकमेवरील अवलंबित्व कमी झाल्याचे मंत्र्यांनी नमूद केले.

# 'ई-चलान' वसुलीसाठी सक्ती केल्यास पोलिसांवरच होणार कारवाई

## पोलीस महासंचालकांचे निर्देश

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

रस्त्यावरील वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यानंतर आकारल्या जाणाऱ्या 'ई-चलान'च्या दंडाची वसुली करताना वाहनचालकांशी उद्धटपणे वागणे आणि दंड भरण्यासाठी सक्ती करणे आता पोलिसांना महागात पडणार आहे. प्रलंबित दंड भरण्यासाठी वाहनचालकांवर कोणत्याही प्रकारची जबरदस्ती करू नये, असे स्पष्ट निर्देश अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) यांनी राज्यातील सर्व पोलीस घटकांना दिले आहेत. या सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर आता थेट शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

राज्यात प्रलंबित ई-चलान वसुलीसाठी वाहतूक पोलिसांकडून विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. मात्र, या मोहिमेदरम्यान अनेक ठिकाणी पोलीस वाहनचालकांना रस्त्यात अडवून 'दंड आत्ताच भरा, अन्यथा वाहन किंवा कागदपत्रे जप्त करू' अशी दमदाटी करत असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या.



**शिस्तभंगाची कारवाई करणार**

ग्राउंडवर काम करणारे पोलीस कर्मचारी अनेकदा वरिष्ठ कार्यालयाने दिलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष करून जनतेला नाहक त्रास देत असल्याचे समोर आले आहे. यामुळे पोलिसांची जनमानसातील प्रतिमा मलिन होत असल्याचे नव्या परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. जे पोलीस अधिकारी किंवा अंमलदार या निदेशांचे उल्लंघन करतील, त्यांच्याविरुद्ध तत्काळ शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या पार्श्वभूमीवर गृह विभागाने या प्रकाराची गंभीर दखल घेतली आहे. परिवहन मंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत पोलिसांच्या या वर्तनाबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली होती.

**'एसओपी'चे पालन अनिवार्य**

वाहतूक विभागाने ई-चलान दंड वसुलीसाठी यापूर्वीच 'आदर्श कार्यप्रणाली' (एसओपी) जाहीर केली आहे. यानुसार, जर वाहनचालक स्वेच्छेने दंड भरण्यास तयार असेल, तरच तो स्वीकारावा. वाहन जप्तीसारखी कारवाई केवळ न्यायालयाच्या आदेशानेच करण्यात यावी. रस्त्यात वाहनचालकांना अडवून त्यांच्याशी उद्धटपणे बोलू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# जेएनपीए बंदरात कंटेनर अडकलेल्या फळे व भाजीपाला निर्यातदारांना मोठा दिलासा : पणन मंत्री जयकुमार रावल

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यातील फळे व भाजीपाला उत्पादक शेतकरी व निर्यातदार यांचे हित लक्षात घेता केंद्र सरकारच्या निर्देशानुसार जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाने (जेएनपीए) अडकलेल्या फळे व भाजीपाला निर्यात कंटेनरवरील साठवण/थांबा कालावधी शुल्क पूर्णपणे माफ करण्याचा, शीतगृह कंटेनर विद्युत जोडणी शुल्कात ८० टक्के सवलत देण्याचा तसेच नवीन जहाज उपलब्ध होईपर्यंत साठवणूक सुविधा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला आहे,अशी माहिती पणन जयकुमार रावल यांनी दिली.



मध्यपूर्वेतील युद्धजन्य परिस्थितीत निर्माण झालेल्या भूराजकीय तणावामुळे भारतातून जीसीसी देशांकडे होणाऱ्या फळे व भाजीपाला नियार्तीसमोर गंभीर संकट निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या मार्गदर्शनात पणन मंत्री जयकुमार रावल यांनी जेएनपी आणि मुद्रा बंदरात अडकलेल्या फळे व फाजीपाला कंटेनरांवर तातडीने शुल्क माफी मिळावी व जहाज उपलब्ध होईपर्यंत साठवणूक सुविधा उपलब्ध करून द्यावी, यासाठी केंद्रीय बंदरे, जहाजरानी व जलमार्ग मंत्री सबार्नंद सोनोवाल तसेच केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पियुष गोयल यांना तातडीच्या उपाययोजना करण्याची विनंती केली होती.

याबाबत केंद्र सरकारने सकारात्मक दखल घेतली.जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाने (जेएनपीए) निर्यात कंटेनरवरील साठवण/थांबा कालावधी शुल्क पूर्णपणे माफ करण्याचा तसेच शीतगृह कंटेनर विद्युत जोडणी शुल्कात ८० टक्के सवलत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ही सवलत २८ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १२ वाजल्यापासून ते १४ मार्च २०२६ रोजी मध्यरात्रीपर्यंत १५ दिवसांसाठी लागू राहणार आहे. ही सवलत २८ फेब्रुवारी रोजी टर्मिनलमध्ये असलेल्या तसेच ८ मार्च रोजी सकाळी ७ वाजेपर्यंत प्रवेश नोंद झालेल्या कंटेनरना लागू असेल.

याशिवाय जेएनपीए आणि टर्मिनल चालकांकडून काही महत्त्वाच्या उपाययोजनाही करण्यात आल्या आहेत. जहाज उपलब्ध होईपर्यंत अडकलेल्या कंटेनरना कंटेनर साठवण आवारात साठवून ठेवण्याची सुविधा देण्यात आली आहे. तसेच सीमाशुल्क विभागाशी समन्वय साधून इतर बंदरांमधून मध्यपूर्वेकडे जाणाऱ्या कंटेनरना तात्पुरत्या पुनर्लोड मालवाहतूक म्हणून जेएनपीए येथे साठवण्याचीही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. वाढत्या मालसाठ्यासाठी टर्मिनलना अतिरिक्त जागाही देण्यात आली आहे.

याशिवाय विलंबामुळे निर्यातदारांवर अतिरिक्त आर्थिक भारही वाढत होता. टर्मिनल विद्युत जोडणी शुल्क, थांबा विलंब शुल्क आणि विलंब दंड यांसारख्या खर्चांमुळे प्रत्येक सात दिवसांच्या विलंबासाठी प्रति कंटेनर सुमारे दोन लाख रुपयांचा अतिरिक्त खर्च येत होता.

सध्या सुमारे २५० कंटेनर जवाहरलाल नेहरू बंदर (जेएनपीटी) येथे अडकून पडले आहेत, तर आणखी सुमारे १५० कंटेनर गुजरातमधील मुंद्रा बंदरावर थांबलेले आहेत.

# गर्भवती सुनेवर बलात्काराचा प्रयत्न फसला... सासऱ्याने गळा दाबून केली हत्या

■ **गडचिरोली। प्रतिनिधी,**

१२ वर्षाच्या विद्यार्थ्यानें रचला स्वतःच्याच अपहरणाचा बनाव, कारण ऐकून थक्क व्हाल...

सिनेमातले कथानकालाही लाजवेल असा एक प्रकार पवनी तालुक्यात समोर आला आहे. एका नामांकित शाळेतील १२ वर्षीय विद्यार्थ्यानें केवळ शिक्षक आणि पालकांच्या भीतीने स्वतःच्या अपहरणाचा ड्रामा रचला. हा प्रकार उघडकीस येताच चचेर्ला उधाण आले आहे.

भंडारा मधील पवनी शहरालगत असलेली आनंदम विद्यामंदिर शाळेत दोन विद्यार्थ्यांमध्ये भांडण झाले. नंतर भांडणाचे रूपांतर हाणामारीत झाले. रागाच्या भरात एका १२ वर्षाच्या विद्यार्थ्यानें टेबलवर काहीतरी अभद्र वाक्य लिहिली. शिक्षकांनी ती वाचताच पालकांना बोलवण्याचे फर्मान सोडले. त्यानंतर मात्र विद्यार्थ्याला धडकी भरली. यावर मार्ग काढण्यासाठी विद्यार्थ्यानें 'एआय'ला काय करायचे असे विचारले असता 'एआय'ने त्याला चुकीची कबुली देण्यास सांगितले. मात्र आपण चूक कबूल केली तर बाबा मारतील या भीतीने या अल्पवयीन विद्यार्थ्यानें दुसरा मार्ग शोधला. त्याने स्वतःच्याच अपहरणाचा बनाव रचला. विद्यार्थ्यानें भीतीपोटी अपहरणाचा असा बनाव रचल्याचे उघड होताच पालकही चकित झाले.

असा केला अपहरणाचा बनाव :

"१२ वषार्चा एक विद्यार्थी शाळेत जाण्यासाठी स्कूल बसची वाट पाहत उभा होता. तोच एका व्यक्तीने तिथे येऊन त्याच्या गळ्यावर चाकू ठेवला आणि चाकूच्या धाकावर त्या विद्यार्थ्यार्चे अपहरण केले. ट्रॅव्हल्समधून उतरलेल्या एका व्यक्तीने या विद्यार्थ्याच्या नाकावर रुमाल ठेवताच तो बेशुद्ध झाला. त्यानंतर त्याला नागपूरच्या दिशेने नेत असताना उमरेडच्या पुढे त्याच्या परिचित असलेल्या एका मंदिराजवळ गाडी थांबताच त्याला अचानक शुद्ध आली, त्याने आरडाओरडा करताच अपहरणकर्त्यांनी तेथून पळ काढला. त्यानंतर विद्यार्थ्याने घरी आईला फोन करून घडलेला सर्व प्रकार सांगितला. थोड्याच वेळात जवळच राहत असलेले त्याचे मामा तेथे पोहोचले आणि ते त्याला सुखरूप घरी घेऊन आले. "

# गर्भवती सुनेवर बलात्काराचा प्रयत्न फसला... सासऱ्याने गळा दाबून केली हत्या

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

नात्याला काळिमा फासणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एका सासऱ्याने आपल्याच सुनेवर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला. मात्र यामध्ये अपयश आल्याने तिची गळा दाबून हत्या केली. धक्कादायक म्हणजे, हत्या झालेल्या महिलेच्या नवऱ्याने आपल्या वडिलांना वाचवण्यासाठी पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला. यामुळे संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे. अभिलाषा कुमारी असं मृत महिलेचं नाव असून बिहारच्या पूर्णिया जिल्ह्यातील ही घटना आहे.

जेव्हा पती अभिषेक घरी परतला, तेव्हा त्याला सत्य समजले. मात्र, पत्नीला मृत्यूचं दुःख त्याला झालंच नाही. उलट त्याने वडिलांचा गुन्हा लपवण्याचा कट रचला. दोघांनी मिळून रात्रीच्या अंधारात अभिलाषाचा मृतदेह एका हातगाडीवर लादला आणि त्यावर कोंबडीच्या खाद्याची पोती रचून तो मृतदेह स्वतःच्या पोल्ट्री फार्ममध्ये लपवून ठेवला. अभिलाषाच्या आईला तिच्याशी संपर्क होत नसल्याने संशय आला आणि त्यांनी नातेवाईकांना तिकडे पाठवले. सुरुवातीला अभिषेकने ती जत्रेला गेल्याची खोटी माहिती देऊन सर्वांना फसवले. मात्र पोलिसांच्या चौकशीत त्याचा बनाव उघड झाला.



**घरी कोणी नसताना साधला डाव**

अभिलाषा कुमारीचे लग्न आठ महिन्यांपूर्वी अभिषेक याच्याशी झाले होते. अभिलाषा चार महिन्यांची गर्भवती होती. रविवारी (8 फेब्रुवारी) रात्री जेव्हा घरात कोणी नव्हते, तेव्हा सासरा टुनटुन मेहता याने सुनेवर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला. यावेळी अभिलाषाने आपल्या चारित्र्यासाठी आणि पोटातील बाळाच्या सुरक्षिततेसाठी जोरदार प्रतिकार केला. या विरोधाने संतप्त झालेल्या सासऱ्याने तिचा गळा घोटून तिला जागीच ठार केले.

पोलिसांनी अभिषेकच्या सांगण्यावरून पोल्ट्री फार्ममधील पोत्यांच्या ढिगाऱ्याखालून कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह बाहेर काढला. पीडितेच्या नातेवाइकांनी आरोप केला आहे की, लग्नानंतर काही काळापासून सासऱ्याची सुनेवर वाईट नजर होती आणि यापूर्वीही त्याने तिच्याशी गैरवर्तन केले होते. त्यावेळी समाजात बदनामी होईल या भीतीने आणि सासऱ्याने पाय धरून माफी मागितल्याने अभिलाषाच्या कुटुंबीयांनी त्याला माफ केले होते. मात्र, ज्याच्यावर विश्वास ठेवला तोच शेवटी तिच्या जीवावर उठला. सध्या पोलिसांनी पती अभिषेकला अटक केली असून मुख्य आरोपी सासरा टुनटुन

# सीआरपीएफ जवानाला मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा

## हॉटेल बुक करुन स्वतःच्याच अल्पवयीन मुलींवर करायचा अत्याचार

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

विशेष पॉक्सो न्यायालयाने बाप लेकीच्या नात्याला काळिमा फासणाऱ्या एका संतापजनक प्रकरणात निकाल सुनावला आहे. आपल्याच पोटच्या दोन मुलींचे लैंगिक शोषण करणाऱ्या एका सीआरपीएफ जवानाला पॉक्सो न्यायालयाने मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. यासोबतच 30 हजार रुपयांचा दंडही ठोठावला. दंडाची रक्कम न भरल्यास त्याला अतिरिक्त तीन महिन्यांचा कारावास भोगावा लागणार आहे. या निकालामुळे पीडित मुलीला अखेर न्याय मिळाला आहे.

**काय आहे प्रकरण?**

हे प्रकरण 2022 मधील असून जमालपूर पोलीस ठाण्याशी संबंधित आहे. धक्कादायक बाब म्हणजे, ज्या बापाने मुलींचे रक्षण करायला हवे होते, तोच हॉटेलमध्ये रूम बुक करून तिच्यावर अत्याचार करत असे. बाप-लेकीच्या पवित्र नात्याला कलंकित करणाऱ्या या कृत्याविरोधात दोषीच्या पत्नीनेच हिंमत दाखवून पोलिसांत तक्रार दाखल केली होती. पत्नीने आपल्या पतीवर पोटच्या मुलींचे लैंगिक शोषण केल्याचा गंभीर आरोप लावला होता, त्यानंतर पोलिसांनी तपास चक्रे फिरवून आरोपीला अटक केली होती.



**सीआरपीएफचा माजी जवान आणि एनएसजीमध्ये सेवा**

या प्रकरणातील दोषी हा केंद्रीय राखीव पोलीस दलाचा माजी जवान असून त्याने एनएजी मध्येही सेवा बजावली आहे. इतकेच नव्हे तर मुंबईतील 26/11 च्या दहशतवादी हल्ल्यावेळी कारवाई करणाऱ्या टीमचाही तो भाग होता. मात्र, देशाचे रक्षण करणाऱ्या या जवानाने स्वतःच्याच अल्पवयीन मुलीवर अत्याचार केले. हॉटेलमध्ये रूम बुक करून तो आपल्या अल्पवयीन मुलीचे शोषण करत असे. याप्रकरणी त्याच्या पत्नीनेच हिंमत दाखवून पतीविरोधात तक्रार दाखल केली होती.

**न्यायालयीन प्रक्रिया**

विशेष सरकारी वकील (पॉक्सो) प्रीतम कुमार वैश्य यांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिसांनी तपास पूर्ण करून दोषारोपपत्र दाखल केल्यानंतर एकूण 11 साक्षीदार नोंदवण्यात आले. या सर्व साक्षीदारांनी आरोपांचे समर्थन केले. उपलब्ध पुरावे आणि दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर, न्यायालयाने 24 फेब्रुवारी 2026 रोजी आरोपीला दोषी ठरवले होते. त्यानंतर सोमवारी (9 मार्च) शिक्षेवर सुनावणी करताना, भारतीय दंड संहिता आणि पॉक्सो कायद्याच्या विविध कलमांनुसार त्याला मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली.



## संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# आत्मनिर्भरतेचा फुगा फुटला



बँक एटीएमबाहेर रांगा. बँकेत नोटा काढण्यासाठी रांगा. तरुण, महिला, वृद्ध असे सर्व रांगेत लागलेले. तिथेच नाश्ता, जेवण आणि काहींना मरणही आले. नोटबंदीचा 2016 चा तो काळ अजून तुम्ही विसरला नसाल. आता अमेरिका-इस्त्रायल यांनी इराणसोबत सुरू केलेल्या युद्धाचा आगडोंब उसळला. त्याच्या झळा आपल्या दारापर्यंत पोहोचू लागल्या आहेत. एलपीजी गॅस सिलिंडर आणि सीएनजीचा तुटवडा भारतात जाणवू लागला आहे. गॅस सिलिंडरचा तुटवडा पडल्यामुळे लोकांवर रांगा लावण्याची वेळ आली आहे. तब्बल दहा वर्षानंतर भारतीय नागरिक पुन्हा रांगेत उभा राहत आहे. घरात गॅस सिलिंडर नाही, काही शहरांमध्ये हॉटेल, रेस्टॉरंटमध्ये पुढील दोन दिवस पुरेल एवढाच गॅसचा साठा आहे. त्यामुळे लोक फक्त महाराष्ट्रातच नाही तर देशभरात गॅस सिलिंडरसाठी रांगेत उभे राहत आहेत. दर वाढले तरीही सिलिंडर मिळत नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे. अजून पेट्रोलची मारामार सुरू झाली नाही, हीच त्यातल्या त्यात समाधानकारक बाब. अवघ्या 11 दिवसांच्या मध्यपूर्वेतील तणावामुळे आपल्या आत्मनिर्भरतेचा आत्मा गॅससारखा उडाला. भारतात एलपीजी गॅसचा तुटवडा एवढ्या मोठ्या प्रमाणात निर्माण झाला की केंद्र सरकारला जीवनावश्यक वस्तू नियंत्रण कायदा (एस्मा) लागू करावा लागला आहे. यामुळे कोणीही एलपीजी गॅस सिलिंडर, पेट्रोल, पेट्रोलियम पदार्थांचा साठा करू नये, त्याचा काळाबाजार होऊ नये, यासाठी सरकारला हा कायदा लागू करावा लागला आहे. पेट्रोलियममंत्री हरदीपसिंग पुरी यांना भाजपचे पोस्टर बॉय खासदार तेजस्वी सूर्या यांना गॅस पुरवठ्यासाठी पत्र लिहावे लागले आहे. सरकारची प्राथमिकता ही घरगुती गॅस सिलिंडरला आहे. त्यामुळे व्यावसायिक वापराच्या गॅस सिलिंडरवर अवलंबून असलेल्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः हॉटेल मालकांना, त्यांना थोडा धीर धरण्याचा सल्ला भाजपचे मंत्री आणि खासदार देत आहेत. भारतीय हे सहनशील आहेत, त्यामुळे ते आणखी काही काळ कळ सहन करतील. तसेही पंतप्रधान मोदींनी नोटबंदीमध्ये 'मला फक्त 50 दिवस द्या', असे म्हणत भारतीयांच्या सहनशक्तीची परीक्षा घेतली आणि त्यात भारतीय नागरिक पासदेखील झाले. पण त्यासाठी त्यांना किंमत मोजावी लागली. काहीजण रांगांमध्ये घेरी येऊन पडले. काहींचे हृदयविकाराने मृत्यू झाले. अमेरिका-इस्त्रायल या दोन्ही देशांनी मिळून इराणवर हल्ला चढवला. त्याला इराणही तेवढ्याच ताकदीने नसेल पण आपल्या पूर्णक्षमतेने आणि हिमतीने प्रतिकार करत आहे. अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्रासोबत लढताना इराणने आपली ताकद एकवटून अधिक कडवट प्रतिकार सुरू केला. त्याचाच भाग म्हणजे इराण आणि ओमान यांच्यादरम्यान असलेली होर्मुझ सामुद्रधुनी हा आखातातील तेलाचा जलमार्ग इराणने बंद करून आशियाई देशांचा गळाच दाबला आहे. सौदी अरेबिया, इराक, यूएई, कुवेत, कतार यांसारख्या प्रमुख तेल उत्पादक देशांचा बहुतेक सर्व माल, क्रूड ऑईल होर्मुझ सामुद्रधुनीमार्गे चीन, भारत, जपान आणि दक्षिण कोरिया यासह अनेक देशांना जातो. तो मार्गच बंद पाडल्यामुळे भारतात क्रूड ऑईल-कच्च्या तेलाची आयात कमी झाली, परिणामी एलपीजी आणि नैसर्गिक गॅसचा पुरवठा थांबला आहे. भारतातील मंत्री, राज्यकर्ते जेव्हा-जेव्हा सर्वकाही आटोक्यात आहे, सुरळीत आहे, असे म्हणतात तेव्हा समजून जायचे असते की परिस्थिती त्यांच्या हाताबाहेर गेली आहे. याचा अनुभव भारताने कोविड-19 काळात घेतला. ते सर्व चीनमध्ये सुरू आहे, परदेशात होत आहे. त्याचा आपल्यावर काही परिणाम होणार नाही, अशी शेखी तेव्हाही मिरवली गेली आणि अचानक देशाला लॉकडाऊनमध्ये ढकलले गेले. संसदेमध्ये विरोधकांनी मध्यपूर्वेतील परिस्थितीवर चर्चेची मागणी केली, मात्र सरकारकडून ती फेटाळण्यात आली. भारत शांततेच्या बाजूने आहे, असे सांगत एस. जयशंकर यांनी सामान्य नागरिक जे रोज बातम्यांमध्ये पाहतो, ऐकतो आणि वाचतो तेच त्यांनी देशाच्या सर्वोच्च सभागृहात सांगितले. सरकार सभागृहात चर्चा करायला तयार नाही. देशाचे परराष्ट्र धोरण काय आहे, हे सांगायला तयार नाही. पंतप्रधान युद्ध सुरू होण्याच्या दोन दिवस आधी इस्त्रायलला जाऊन आले. इराणचे लढाऊ जहाज आपल्या देशात आले होते. राष्ट्रपतींना त्यांनी सलामी दिली. त्यातील एका जहाजाला मायदेशी परतताना अमेरिकेने जलसमाधी दिली. त्यानंतरही आपल्याकडून शोक ना संदेश पाहायला मिळाला. त्या युद्धनौकेबद्दल बोलायला परराष्ट्रमंत्री तयार नाहीत. भारताला रशियाकडून तेल खरेदीची परवानगी अमेरिका देते, भारताच्या सार्वभौमत्त्वाचे काय झाले, हा प्रश्न थोडावेळ बाजूला ठेवला तरी, रशियाकडून भारताने पेट्रोलियम पदार्थांची खरेदी केली की नाही, केली असेल तर भारतात इंधनाचा, गॅसचा प्रश्न का निर्माण झाला, हे कोणी सांगत नाही. गॅस तुटवड्यावर पेट्रोलियममंत्री समोर येऊन बोलायला तयार नाहीत. देशात किती तेल, गॅस साठा आहे, किती दिवस पुरेल सर्वकाही गुलदस्त्यात आहे. त्यामुळे सामान्य माणसाचे प्राक्तन हे फक्त रांगेत उभे राहणे. जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था असल्याचा दावा करणारे, भारताला विश्वगुरूपद मिळवून देण्याची आशा दाखवणारे सगळेच आखाती युद्धामुळे गॅसवर गेले आहेत. मेक इन इंडियाचे दावे किती दुबळे आहेत, हे दिसत आहेत. हे थेट युद्ध आपल्याशी नसले तरी आपण बेजार झालो आहोत. या युद्धाचे भविष्य काय ते दिसेलच, पण एक देश म्हणून आपण किती परावलंबी आहोत, हे या युद्धाने दाखवून दिले आहे. आत्मनिर्भरतेचा फुगा फुटला आहे. यातून आपला भ्रम दूर व्हावा आणि आपल्या सरकारने देशाची स्थिती अधिक मजबूत करण्यावर भर द्यावा ही अपेक्षा.

# शाळांची मनमानी मोडणारा न्यायालयाचा निकाल

राज्यघटनेतील आणि शिक्षण मिळण्याचा अधिकार कायद्यातील तरतुदींसोबतच सर्वोच्च न्यायालयाने 2023 मध्ये सुखदेव साहा विरुद्ध आंध्र प्रदेश या खटल्यामध्ये काही मार्गदर्शक तत्त्वे आखून दिली आहेत. लहान मुलांचे मानसिक आरोग्य जपण्यासाठी ही तत्त्वे आखण्यात आली आहेत. शाळा, खासगी शिकवणी, शिक्षक, मुख्याध्यापक, अशैक्षणिक कर्मचारी, व्यवस्थापन या सगळ्यांसाठी ही मार्गदर्शक तत्त्वे लागू करण्यात आली आहेत.



आपल्याकडे शाळेचे शैक्षणिक शुल्क अर्थात फी हा कायमच चर्चेचा विषय असतो. शाळा व्यवस्थापनाने केलेल्या फी वाढीविरोधात पालकांनी आंदोलन केल्याच्या घटना अधून मधून समोर येत असतात. खासगी शाळांचे महत्त्व वाढल्यानंतर फी वाढीचा विषय अधिक तीव्र झाला. पालक विरुद्ध शाळेचे व्यवस्थापन असा संघर्ष सुरू झाला. शाळेच्या फी संदभार्तील एक याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये गेल्यावर्षी दाखल झाली होती. त्यावर गेल्याच महिन्यात निकाल देण्यात आला. या निकालामध्ये राज्यघटनेच्या तिर्सया भागातील मूलभूत अधिकारांतर्गत मिळालेला शिक्षणाचा अधिकार, शिक्षण हक्क कायद्यातील तरतूद, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) संलग्नता नियमावली या सगळ्यांबद्दल सविस्तरपणे विवेचन करण्यात आले आहे. फी भरली नाही, म्हणून विदर्भातील एका शाळेने सातवीत शिकर्णाया एका विद्यार्थिनीला शाळेतून काढून टाकले होते. शाळा सोडल्याचा दाखला तिला न मागता देण्यात आला. याच विषयावरून संबंधित मुलीने आणि तिच्या वडिलांनी उच्च न्यायालयात याचिका (रिट पिटीशन) दाखल केली.

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न असलेल्या शाळेमध्ये ही विद्यार्थिनी शिकत होती. शाळेने घेतलेल्या सातवीच्या परीक्षेत ती उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाली. यानंतर अपेक्षेप्रमाणे ती आठव्या इयत्तेत जाणे अपेक्षित होते. पण शाळेने फी न भरल्याचे कारण देऊन संबंधित विद्यार्थिनीला शाळेतूनच काढून टाकले. तत्पूर्वी तिच्या पालकांना फी भरण्यासाठी आवश्यक नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. पालकांनी त्याला प्रतिसाद दिला नाही आणि दिलेल्या वेळेत फी भरली नाही म्हणून संबंधित विद्यार्थिनीला शाळेतून काढण्यात आले. उच्च न्यायालयाने निकाल देताना संबंधित विद्यार्थिनीला शाळेतून काढून टाकण्याचा निर्णय बेकायदा ठरवला आणि रद्दबातल केला. तिला शाळेत पुन्हा दाखल करून घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले. असे करतानाच तिच्या पालकानाही शाळेची थकीत फी दोन आठवड्यांमध्ये जमा करण्याचे आदेश देण्यात आले. या निकालापर्यंत उच्च न्यायालय कसे आले हेसुद्धा बघितले पाहिजे.

भारतीय राज्यघटनेच्या तिर्सया भागात देशाच्या नागरिकांना मूलभूत अधिकार देण्यात आले आहेत. 2002 मध्ये 86 व्या घटनादुरुस्तीने आणखी एका मूलभूत अधिकाराची भर त्यामध्ये घालण्यात आली. हा मूलभूत अधिकार आहे शिक्षणाचा अधिकार. देशातील ६ ते 14 वयोगटातील प्रत्येक मुला-मुलीला मोफत आणि बंधनकारकपणे शिक्षण देण्याची जबाबदारी या अधिकाराने सरकारवर टाकण्यात आली आहे. यासाठी राज्यघटनेमध्ये '21 अ' असा नवा अनुच्छेद दाखल करण्यात आला. कोणाच्याही मूलभूत अधिकारांचे हनन होत असेल, तर त्याला याविरोधात थेट उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार त्याच राज्यघटनेमध्ये देण्यात आला आहे. अनुच्छेद 32 आणि 226 मध्ये त्यासाठीची तरतूद करण्यात आली आहे. वर दिलेल्या खटल्यातील पालकांनी याच तरतुदीचा वापर करून उच्च न्यायालयात दाद मागितली. राज्यघटनेतील याच अनुच्छेदाचा वापर करून आणि या अधिकाराला नेमके रूप देण्याच्या उद्देशाने 2009 मध्ये एक कायदा करण्यात आला. 'मोफत आणि बंधनकारक शिक्षण मिळण्याचा लहान मुलांचा अधिकार' कायदा असे त्याचे नाव. या कायद्यातही राज्यघटनेतील अनुच्छेदानुसार मुला-मुलींना शिक्षण मिळण्यासाठीच्या सर्व तरतुदी सविस्तरपणे करण्यात आल्या आहेत.

राज्यघटनेतील आणि शिक्षण मिळण्याचा अधिकार कायद्यातील तरतुदींसोबतच सर्वोच्च न्यायालयाने 2023 मध्ये सुखदेव साहा विरुद्ध आंध्र प्रदेश या खटल्यामध्ये काही मार्गदर्शक तत्त्वे आखून दिली आहेत. लहान मुलांचे मानसिक आरोग्य जपण्यासाठी ही तत्त्वे आखण्यात आली आहेत. शाळा, खासगी कोचिंग क्लासेस, शिक्षक, मुख्याध्यापक, अशैक्षणिक कर्मचारी, व्यवस्थापन या सगळ्यांसाठी ही मार्गदर्शक तत्त्वे लागू करण्यात आली आहेत. शाळेमध्ये आणि कोचिंग क्लासेसमध्ये मुला-मुलींशी कशा पद्धतीने वागायचे, काय करायचे नाही, याबद्दलची सविस्तर माहिती त्यामध्ये देण्यात आली आहे. याचाही विचार हा निकाल देताना उच्च न्यायालयाने केला.

संबंधित विद्यार्थिनीला शाळेमध्ये शिक्षण हक्क कायद्यानुसार (आरटीई) प्रवेश देण्यात आला नव्हता, असा युक्तिवाद प्रतिवादी पक्षाकडून करण्यात आला. म्हणजेच जर शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रवेशच मिळालेला नाही, तर तो कायदा संबंधित विद्यार्थिनीला गैरलागू ठरतो, असा युक्तिवाद होता. उच्च न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळून लावला. उच्च न्यायालयाने म्हटले की 'मोफत आणि बंधनकारक शिक्षण मिळण्याचा लहान मुलांचा अधिकार' कायद्यामध्ये मूल (चाईल्ड) म्हणजे नक्की कोण याची व्याख्या करण्यात आली आहे. कायद्याच्या कलम 2 (क) नुसार मूल म्हणजे ६ ते 14 वयोगटातील मुलगा किंवा मुलगी. कायद्याच्या कलम 3 मध्ये, प्रत्येक मुलाला मोफत आणि बंधनकारक शिक्षण मिळण्यासंदभार्तील तरतूद करण्यात आली आहे. त्यामध्येही ६ ते 14 वयोगटातील प्रत्येक मुलाला जवळच्या शाळेत मोफत आणि बंधनकारकपणे शिक्षण मिळणे हा त्याचा हक्क आहे, अशी तरतूद करण्यात आली आहे. या दोन्ही तरतुदी ६ ते 14 वयोगटातील प्रत्येक मुलासाठी लागू होतात. म्हणजेच त्या या खटल्यातील विद्यार्थिनीसाठीही लागू होतात, असे सांगत उच्च न्यायालयाने प्रतिवादी पक्षाचा युक्तिवाद फेटाळला.

खटल्यातील शाळा ही केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न आहे. कोणत्याही शाळेला या मंडळाशी संलग्न होण्यासाठी नियमावलीचे पालन करावे लागते. 'संलग्नता नियमावली 2018' अशी ही नियमावली आहे. या नियमावलीनुसार सुद्धा संलग्नता मिळर्णाया प्रत्येक शाळेवर 'मोफत आणि बंधनकारक शिक्षण मिळण्याचा लहान मुलांचा अधिकार' कायद्यातील तरतुदी बंधनकारक आहेत. कोणतीही शाळा लिंग, जात, धर्म, पंथ, जन्मठिकाण, अपंगत्व या आधारावर भेदभाव करून कोणालाही प्रवेश नाकारणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. न्यायालयाने या संलग्नता नियमावलीचाही आधार घेतला.

'मोफत आणि बंधनकारक शिक्षण मिळण्याचा लहान मुलांचा अधिकार' कायद्यानुसारच शाळेला मंजुरी मिळेल, अशी बळजबरी शिक्षणाधिकर्यािने मंजुरी देताना केली होती, असा युक्तिवाद प्रतिवादी पक्षाकडून करण्यात आला. पण या बळजबरीविरोधात शाळा व्यवस्थापनाने कोणत्याही न्यायालयात दाद मागितली नाही. शिक्षणाधिकर्यांनी केलेल्या कथित बळजबरीनंतरही त्यांनी शाळा सुरू केली आणि आता बळजबरी केल्याचा युक्तिवाद करीत आहेत, असे निरीक्षण नोंदवत उच्च न्यायालयाने त्यांचा हा युक्तिवादही फेटाळून लावला.

या सर्व घटकांचा विचार करून उच्च न्यायालय वर दिलेल्या निकालापर्यंत आले आणि त्यांनी संबंधित विद्यार्थिनीला पुन्हा शाळेत दाखल करून घेण्याचे आदेश दिले. फी भरली नाही म्हणून कोणत्याही मुलाला किंवा मुलीला शाळा व्यवस्थापन शाळेतून काढून टाकू शकत नाही, हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे. ६ ते 14 वयोगटातील प्रत्येक मुलाला शिक्षण मिळाले पाहिजे, यासाठी राज्यघटनेत आणि 'मोफत शिक्षण मिळण्याचा लहान मुलांचा अधिकार' कायद्यात तरतुदी आहेत. त्याचा वापर सुजाण पालकांनी केला पाहिजे. याचा अर्थ शाळेची फी भरायची नाही, असा मुळीच होत नाही. शाळेची फी आणि त्याचे नियमन हे महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क नियमन) कायदा, 2011 नुसार होते. या कायद्यातील कलम 3 (अ) (2) नुसार खासगी विनाअनुदानित शाळांचे व्यवस्थापन निर्धारित वेळेत फी न भरणाऱ्या पालकांकडून दंड म्हणून जास्तीचे शुल्क आकारू शकते. या व्यतिरिक्त इतर कोणतीही कारवाई करण्याचा अधिकार या शाळांना नाही. फी भरली नाही म्हणून संबंधित विद्यार्थ्याला शाळेतून काढूनच टाकण्याचा अधिकार तर शाळांना नाहीच. जर कायद्यामध्ये तशी तरतूदच नाही, तर शाळा व्यवस्थापन मनमानीपणे कोणत्याही विद्याथ्यासीबत तसे वागूही शकणार नाही. या खटल्यातून हे सगळे समजून घेणे पालक आणि शाळा व्यवस्थापन दोघांच्या हिताचे आहे.

# युद्धात अकचा वापर करण्यास ट्रम्पना रोखले!



अमेरिकेत सध्या जे काही घडतंय ते भयानकच आहे. युद्धात सरसकटपणे कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) वापरण्याचा ट्रम्प यांचा आग्रह आहे. मात्र, अँथ्रोपिक कंपनीने त्यास विरोध केला आहे. कशासाठी?

एकविसाव्या शतकात तंत्रज्ञान हे केवळ प्रगतीचे साधन राहिले नसून ते सत्तेच्या संघषार्चे मुख्य रणांगण बनले आहे. खासकरून अमेरिकेत जे द्वंद उभे राहिले आहे ते काळजीत टाकणारेच आहे. 'अँथ्रोपिक' ही अमेरिकेतील आघाडीची एआय कंपनी. याच कंपनीची सेवा अमेरिकन संरक्षण मंत्रालय (पेंटागॉन) वापरते. मात्र, पेंटागॉन आणि अँथ्रोपिक यांच्यात जोरदार खटके उडले आहेत. त्यामुळे अभूतपूर्व संघर्ष पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे, तो केवळ एका करारापुरता मर्यादित नाही, तर तो मानवी मूल्ये आणि युद्धातील तांत्रिक वर्चस्व यांच्यातील आहे. 'न्यूयॉर्क टाइम्स'ने प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अँथ्रोपिकच्या तंत्रज्ञानाचा वापर तातडीने थांबवण्याचे आदेश दिले आहेत, ज्यामुळे सिलिकॉन व्हॅली आणि वॉशिंग्टन यांच्यातील दरी आता स्पष्टपणे निदर्शनास आली.

अँथ्रोपिक ही कंपनी तिच्या 'क्लॉड' या एआय मॉडेलसाठी ओळखली जाते. क्लॉड हे मॉडेल टेक्स्ट समजून घेते, प्रश्नांना उत्तर देते, माहिती संश्लेषित करते आणि कित्येक गोष्टींमध्ये मानवी सहाय्य करते. ते चॅटजीपीटीसारखेच आहे, पण काही बाबतीत वेगळ्या नियमांखाली बनवलेलं आहे. एआय म्हणजे कॉम्प्युटर प्रोग्राम ज्याला स्वतः विचार करण्याचे किंवा निर्णय घेण्याचे लहान-मोठे सामर्थ्य असते, पण हे मानवी बुद्धिमत्तेपेक्षा पूर्णपणे स्वतंत्र नाही. आजही एआयचे निर्णय मानवी काळजी, नियम आणि जबाबदारीखाली ठेवले जातात. कंपनी सुरुवातीपासूनच 'सेफ्टी-फर्स्ट' (सुरक्षिततेला प्राधान्य) या भूमिकेवर ठाम आहे. वादाची ठिणगी तेव्हा पडली जेव्हा पेंटागॉनने अँथ्रोपिककडे त्यांच्या तंत्रज्ञानाचा 'सर्व कायदेशीर कारणांसाठी' विनाअट वापर करण्याची मागणी केली. यामध्ये प्रामुख्याने दोन गोष्टींचा समावेश होता : पूर्णपणे स्वायत्त लष्करी शस्त्रे आणि अमेरिकन नागरिकांवर मोठ्या प्रमाणावर पाळत ठेवणे.

अँथ्रोपिकने क्लॉडचा वापर सुरुवातीला काही लष्करी कामांसाठी केला होता आणि तो पेंटागॉनच्या अनेक कामांमध्ये मदत करत होता. युद्धात माहिती पाहणे, विश्लेषण करणे, सिम्युलेशन करणे आणि निर्णय-सहाय्य यासारखी कामे एआय खूप वेगाने करू शकते. पण नंतर, जेव्हा पेंटागॉनने अँथ्रोपिकला आग्रह केला की, एआयला अधिक स्वातंत्र्याने युद्धातील निर्णयांसाठी वापरू द्या, कोणतेही बंधन न ठेवता, तेव्हा मोठा वाद सुरू झाला. घरगुती नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर डेटा वापरून त्यांची माहिती गोळा करण्याने नागरिकांच्या हक्कांवर प्रश्न उठू शकतो, असे कंपनीचे म्हणणे आहे. अँथ्रोपिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी डारियो अमोदेई यांनी या अटी मान्य करण्यास स्पष्ट नकार दिला. त्यांच्या मते, "एआय प्रणाली अजूनही इतकी विश्वासार्ह झालेली नाही की तिने मानवी हस्तक्षेपाशिवाय कोणाचा जीव घ्यावा की नाही, याचा निर्णय घ्यावा. तसेच, आम्ही देशाच्या संरक्षणासाठी तंत्रज्ञान देण्यास तयार आहोत, पण मानवी मूल्ये गहाण ठेवून नाही", असे अमोदेई यांनी ठासून सांगितले आहे. एआयचा वापर संरक्षणात्मक कामांसाठी किंवा डेटा विश्लेषणासाठी करण्यास त्यांची हरकत नाही, परंतु स्वायत्त शस्त्र प्रणाली विकसित करण्यासाठी हे तंत्रज्ञान देणे त्यांच्या नैतिक मूल्यांच्या विरोधात आहे.

राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी या प्रकरणाला राजकीय वळण दिले आहे. त्यांनी अँथ्रोपिकला 'लेफ्टविंग नट जॉब्स' (डाव्या विचारसरणीचे वेडे) असे संबोधून त्यांच्यावर अमेरिकेच्या सुरक्षेशी खेळ करीत असल्याचा आरोप केला आहे. तसेच राष्ट्राध्यक्ष ट्रम्प आणि संरक्षण विभागाने अँथ्रोपिकच्या या भूमिकेला 'राष्ट्रीय सुरक्षेत अडथळा' असल्याचे म्हटले आहे. पेंटागॉनच्या मते, जर अमेरिकन कंपन्यांनी हे तंत्रज्ञान लष्कराला दिले नाही, तर चीन आणि रशिया या शर्यतीत पुढे निघून जातील. ट्रम्प यांच्या आदेशानुसार, अँथ्रोपिकला पुरवठा साखळीसाठी धोका (सप्लाय चेन रिस्क) म्हणून घोषित करण्यात आले आहे. हे लेबल सामान्यतः केवळ शत्रू राष्ट्रांतील कंपन्यांना दिले जाते.

पेंटागॉनने म्हटलं की, "आम्हाला सर्व कायदेशीर वापरासाठी एआयची मुभा हवी आहे". याचा अर्थ असा की, संवेदनशील असलं तरीही सरकार एआयचा वापर बिनबोभाट करू शकेल. युद्ध आणि सुरक्षा क्षेत्रात एआयची पूर्ण क्षमता मिळवणे आवश्यक आहे आणि त्याला कंपनीने मर्यादा लावू नयेत. पेंटागॉनच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, ते स्वयंचलित हत्या करणारे शस्त्रे बनवण्याची किंवा नागरिकांना नजर ठेवण्याची इच्छा ठेवत नाहीत, पण एआयचा वापर 'सर्व कायदेशीर कामे' करण्यासाठी हवा आहे. पेंटागॉनचे प्रवक्ते सीन पार्नेल यांनी इशारा दिला की, "कोणतीही खासगी कंपनी लष्कराला युद्ध कसे लढावे हे शिकवू शकत नाही." प्रशासनाने अँथ्रोपिकला सहा महिन्यांचा अवधी दिला असून, या काळात त्यांनी लष्करी मागण्या मान्य न केल्यास त्यांच्यावर गंभीर दिवाणी आणि फौजदारी कारवाई करण्याची धमकीही दिली आहे.

अँथ्रोपिकने नकार दिल्यानंतर काही तासांतच 'ओपन-एआय' या प्रतिस्पर्धी कंपनीने पेंटागॉनशी हातमिळवणी केली. ओपन एआयचे प्रमुख सॅम ऑल्टमन यांनी जाहीर केले की, त्यांची कंपनी वगीर्कृत लष्करी नेटवर्कवर एआय पुरवण्यासाठी तयार आहे. जरी आपण सुरक्षा नियमांचे पालन करू असे ऑल्टमन यांनी म्हटले असले, तरी ज्या वेगाने हा करार झाला, त्यावरून असा प्रश्न उपस्थित होतो की, एआय कंपन्यांमध्ये बाजारपेठेतील वर्चस्वासाठी नैतिकतेशी तडजोड करण्याची स्पर्धा सुरू झाली आहे का?

हा वाद अशा वेळी समोर आला आहे जेव्हा अमेरिकेने इराणमधील हल्ल्यात आणि व्हेनेझुएलातील कारवाईत 'क्लॉड'चा वापर केल्याचे वृत्त 'वॉल स्ट्रीट जर्नल'ने दिले आहे. जरी अँथ्रोपिकने हे नाकारले असले, तरी युद्धभूमीवर एआयची उपयुक्तता सिद्ध झाली आहे. पण प्रश्न हा आहे की, जर एआयने चुकीचा निर्णय घेतला आणि त्यात निष्पाप नागरिक मारले गेले, तर त्याची जबाबदारी कोणाची?

पेंटागॉनचे म्हणणे आहे, की एआयमुळे युद्धात अचूकता येईल आणि सैनिकांचे प्राण वाचतील. मात्र, तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे, की 'हॅलुसिनेशन' (एआयने चुकीची माहिती खरी मानणे) ही एआयमधील मोठी त्रुटी आहे. युद्धाच्या मैदानात अशी छोटी चूकही मोठ्या नरसंहाराला कारणीभूत ठरू शकते. जर एखाद्या एआय प्रणालीने चुकीचा निर्णय घेतला, तर त्याची जबाबदारी कोणाची? अँथ्रोपिकने घेतलेली भूमिका सरकारी दबावापुढे ती किती काळ टिकेल, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. हा संघर्ष दर्शवतो की येणाऱ्या काळात युद्धे केवळ शस्त्रांनी नाही, तर कोडिंग आणि अल्गोरिदमच्या जोरावर लढली जातील, जिथे नैतिकता आणि सामर्थ्य यांचा मोठा संघर्ष पाहायला मिळेल. हा वाद फक्त एका कंपनी आणि सरकारचा नाही तर तो भविष्याच्या एआय आधारित युद्ध, राष्ट्रीय सुरक्षा आणि मानवी निर्णयांच्या सीमांवर एक मोठी परीक्षा आहे. अँथ्रोपिक म्हणते की, तंत्रज्ञान अद्याप इतकं विश्वासार्ह नाही की ते युद्धातील जीवन-मृत्यू निर्णय घेऊ शकतं आणि तंत्रज्ञान हक्कांचे उल्लंघन करू नये. पेंटागॉन म्हणतो की, राष्ट्राची सुरक्षा सर्वात महत्त्वाची आहे आणि एआयला ज्यामध्ये वापर आवश्यक ते सर्व कायदेशीर कामांमध्ये वापरणं हवं. यातून पुढे येणारे परिणाम आणि निर्णय एआय आणि मानवतेच्या भविष्यात एक मोठा ठसा उमटवतील.

अँथ्रोपिक आणि पेंटागॉनमधील हा संघर्ष येणाऱ्या अनेक वर्षांपर्यंत चर्चेत राहील. हे केवळ एका सॉफ्टवेअरबद्दल नाही, तर मानवी भविष्याच्या नियंत्रणाबद्दल आहे. जर तंत्रज्ञान कंपन्यांनी लष्कराच्या प्रत्येक मागणीला होकार दिला, तर आपण एका अशा जगाकडे जाऊ जिथे मशीन माणसांचे नशीब ठरवतील आणि जर कंपन्यांनी अडवणूक केली, तर राष्ट्रीय सुरक्षेचे काय? आज अँथ्रोपिक एकाकी पडल्यासारखी वाटत असली, तरी त्यांनी घेतलेली नैतिक भूमिका भविष्यात एआय एथिक्ससाठी एक मैलाचा दगड ठरू शकते. लोकशाही देशांनी तंत्रज्ञान आणि लष्करी सामर्थ्य यांच्यात संतुलन राखण्याची गरज आहे, अन्यथा आपण तयार केलेले तंत्रज्ञानच आपल्या विनाशाचे कारण ठरेल.

# मस्तवालांना आवरणार कोण?



दुसऱ्या महायुद्धात एकमेकांचे कडवे विरोधक असलेले अमेरिका आणि तत्कालीन सोव्हिएत संघ बलशाली ठरलेल्या अडॉल्फ हिटलरला नेस्तनाबूत करण्यासाठी एकत्र आले होते. अमेरिकेत लोकशाही असली तरी तो भांडवलशाहीप्रदान देश तर सोव्हिएत संघ भांडवलशाहीविरोधी कम्युनिस्ट देश. त्यामुळे महायुद्धातील दोस्त असलेले ब्रिटन आणि अमेरिका हे सोव्हिएत संघाच्या विरोधात होते. ब्रिटनचे साम्राज्य नष्ट करण्यासाठी हिटलरने सगळी शक्ती पणाला लावली होती. अतिशय संहारक शस्त्रास्त्रे बनविण्याचा सपाटा लावला होता. त्यासाठी त्याने अतिशय बुद्धिमान अशा जर्मन शास्त्रज्ञांना कामाला लावले होते. त्यावेळी अशी वदंता होती की, जर्मनीची मजल अणुबॉम्ब बनविण्यापर्यंत गेलेली आहे. त्यावेळी हिटलरने ब्रिटनवर शक्तिशाली हल्ले करून त्याचा काटा ढिला करून टाकला होता. आता कुणी मोठ्या ताकदीचे राष्ट्र मदतीला आल्याशिवाय ब्रिटनचे काही खरे नव्हते. त्यावेळी ब्रिटनचे पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांनी अमेरिका आणि सोव्हिएत संघाशी बोलणी केली. तेव्हा अमेरिका आणि जोसेफ स्टॅलिनच्या नेतृत्वाखालील सोव्हिएत संघाने दोन्ही बाजूने हल्ले करून जर्मनीची कोंडी केली आणि हिटलरला आत्महत्या करायला भाग पाडले. त्यानंतर दुसरे महायुद्ध संपले. पण त्यावेळेपासून ब्रिटनचे साम्राज्य संपले. त्यानंतर अमेरिका आणि सोव्हिएत संघ यांच्यात जागतिक सत्तास्पर्धा सुरू झाली. दुसरे महायुद्ध या दोघांनी संपवले, पण त्यानंतर या दोन महाशक्ती देशांमध्ये जुंपली. जग दोन ध्रुवांमध्ये विभागले आहे. काही राष्ट्रे अमेरिकेच्या गोटात गेली तर काही सोव्हिएत संघाच्या. भारताने दोन्ही देशांपासून सुरक्षित अंतर ठेवले. कारण भारत नुकताच ब्रिटनच्या गुलामगिरीतून मुक्त झाला होता. त्यामुळे दोघांपैकी कुणाच्या तरी गोटात सामील होऊन पुन्हा आपले स्वातंत्र्य गमावण्याचा धोका भारताला पत्करायचा नव्हता. तरीही भारत सोव्हिएत संघाच्या जवळ राहिला. सध्या इस्त्रायल आणि अमेरिका यांनी इराणविरोधात युद्ध पुकारलेले आहे. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या कुटुंबीयांसह लष्करातील प्रमुख अधिकर्यांचा दोघांनी मिळून खात्मा केलेला आहे. आखाती भागात शिया आणि सुन्नी पंथीय राष्ट्रे आहेत. इराण हा शिया पंथीय आहे. त्यामुळे या मोठ्या युद्धाला ही पंथीय किनारही आहे. आखातातील काही देश आणि इस्त्रायल यांचे तेढ आहे. त्यामुळे इस्त्रायलच्या निर्मितीपासून दोन्ही बाजूंमध्ये संघर्ष सुरू आहे. दुर्सया महायुद्धानंतर अमेरिका आणि सोव्हिएत संघ यांच्यातील थेट जागतिक सत्तास्पर्धा 1991 सालापासून कमी झाली. कारण 1991 साली सोव्हिएत संघाचे विघटन झाले. त्यापासून बरीच राष्ट्रे बाहेर पडली. असे असले तरी या दोघांमध्ये सत्तास्पर्धा संपली नाही. त्यांनी इतर देशांना आपली रणभूमी बनवले आणि तिथे युद्धे सुरू ठेवली. ती रणभूमी होती अफगाणिस्तान आणि त्याला लागून असलेले आखाती देश. दुर्सया महायुद्धापर्यंत हे आखाती देश फारसे चर्चेत नव्हते, पण पुढे जेव्हा ते तेलसंपन्न झाले आणि प्रचंड श्रीमंती त्यांच्याकडे आली तेव्हा ते चर्चेत आले. युद्ध हे केवळ भावनेवर लढता येत नाही. भावनेला साथ देण्यासाठी पैशाची गरज असते, साधनांची गरज असते, शस्त्रांची गरज असते. आखाती देशांकडे तेलाचा प्रचंड पैसा आला. त्यांनी युरोप अमेरिकेतून बुद्धिमान लोकांना बोलावून आधुनिक सुविधांनी युक्त अशी शहरे उभारून घेतली. बुर्ज खलिफासारख्या जगाचे लक्ष वेधून घेर्णाया इमारती उभारल्या. आज इराण जे अमेरिका आणि इस्त्रायलविरोधात लढत आहे तो त्यांच्याकडे असलेल्या तेलश्रीमंतीमुळे. नाही तर त्यांना ते शक्य झाले नसते. 1991 साली सोव्हिएत संघाचे विघटन झाल्यानंतर त्या जागी रशिया राहिलेला आहे. त्या देशामध्ये लोकशाही नाममात्र आहे. व्लादिमीर पुतिन रशियाचे सर्वेसर्वा आहेत. अमेरिका आणि रशिया यांचा आखातातील तेलावर डोळा आहे.

# हेअर कलर करा पण सांभाळून...

**आजकाल मुली असो वा स्त्रिया हेअर कलर करण्याचं क्रेझ वाढलं आहे. सध्या लेटेस्ट रंग वापरून आपल्या पर्सनालिटीला एक वेगळा लुक देता येतो. अलीकडे ब्राऊन, चॉकलेट, बरगंडी आणि ब्लँड फॅशनमध्ये आहे. त्यातून हायलायटिंगचा ट्रेंड आहे. मात्र केसांना कलर देण्यापूर्वी त्यांचा प्रकार समजून घेणं गरजेचं आहे.**

### कलर करण्यापूर्वी हे करा

- कलर करण्यापूर्वी हेअर कटिंग किंवा ट्रिमिंग करून घ्या.
- कलरिंगसाठी दिलेल्या निदेशांक पुस्तिकेत सांगितल्याप्रमाणे हेअर कलर करण्यापूर्वी ॲलर्जी टेस्ट करून घ्या.
- कलर वापरण्यापूर्वी दिलेल्या सूचना नीट वाचून घ्या.
- आपल्या केसांवर पूर्वी कधीच रंगांचा वापर केलेला नाही की ते आधीपासूनच रंगलेले आहेत. जे जाणून घेतल्यानंतर योग्य रंगाची निवड करा.
- कलर निवडण्यापूर्वी काही शंका असेल तर हेअर एक्सपर्टचा सल्ला घ्या.
- कलर करण्यापूर्वी एकाच आकाराचे फॉइल तयार ठेवा.
- अता व्ही शेपमध्ये केस घेऊन त्याचे पातळ सेक्शन करून घ्या. त्याखाली फॉइल ठेवून केसांना कलर करा आणि दोन्ही बाजूने दुमडून फोल्ड करा. हायलाइट एकासारखं असावं हे लक्षात असू द्या.
- कलर झाल्यावर अर्ध्या तासाने फॉइल काढा आणि केस धुऊन शेपू करा. केस





वाळल्यावर वेगळाच लुक येईल.

### हे करू नका

- कलर करताना केसांच्या मुळांना कलर लावू नका.
- वयाने जास्त असलेल्या स्त्रियांनी डार्क रंगाचा वापर करू नये.
- ओल्या केसांमध्ये कलर करू नये याने कलर स्कल्पवर पसरतो.
- कलर केलेले केस कधीच गरम पाण्याने धुऊ नये. याने कलर फिकट होऊ लागतो.
- दुर्सयांचं पाहून रंगाची निवड करू नये. आपल्याला जो शोभेल तोच कलर वापरा.

---

**चॉकलेट कोणाला आवडत नाही? लहानापांसून थोरामोठ्यांपर्यंत चॉकलेट आवडीने खातात. मात्र दातांवर परिणाम होऊ नये यासाठी काहीजण चॉकलेट खात नाहीत. मात्र तुम्हाला माहीत आहे का चॉकलेट खाण्याचेही अनेक आश्चर्यकारक फायदेही आहेत.**

# चॉकलेट खाण्याचे हे आहेत फायदे

**तणाव कमी करण्यासाठी फायदेशीर**

– तणाव कमी करण्यासाठी चॉकलेट अधिक फायदेशीर आहे. डार्क चॉकलेट खाण्याने तणाव कमी होतो. उच्च रक्तदाबाचा त्रास कमी करण्यासाठी चॉकलेटचे सेवन परिणामकारक ठरते. कोकोमध्ये असलेले अँटीऑक्सिडंटस् स्वास्थ चांगले राखण्यासाठी मदतशीर ठरतात. हृदयासाठीही चॉकलेट फायदेशीर आहे. चॉकलेटच्या सेवनाने हृदयरोगाची शक्यता कमी होते. चॉकलेट खाण्याने व्यक्तीचा मूड सुधारतो. कोकोच्या सेवनाने थकवा कमी होण्यास मदत होते.

**वजन घटवण्यात गुणकारी**

– ॅलिफोर्नियाच्या सॅन डिगो विद्यापीठात करण्यात आलेल्या संशोधनानुसार नियमितपणे चॉकलेट खाल्ल्याने वजन कमी होण्यात मदत होते. वैज्ञानिकांनुसार चॉकलेटमधील कोको फ्लॅवनॉल वाढत्या वयासंबंधित आजारांना दूर ठेवते. अमेरिकेच्या संशोधनानुसार, रोज हॉट चॉकलेटचे दोन कप सेवन केल्यास मानसिक स्वास्थ्य चांगले राहते. तसेच स्मरणशक्तीही वाढते.



---

# प्रेग्नन्सी दरम्यान कारल्याचे सेवन करावे की करु नये, दूर करा कन्फ्यूजन

गर्भावस्थेत स्त्रिया आपल्या खाण्यापिण्याबद्दल फारच कॉन्शियस होऊन जातात. काय खायला पाहिजे काय नाही, या बद्दल बऱ्याच गर्भवती स्त्रियांना योग्य माहिती नसते. बऱ्याच महिला गर्भावस्थेत कारले खायला पाहिजे की नाही याबद्दल भ्रमित असतात. तर त्यांचे कंफ्यूजन आपण दूर करू. गर्भावस्थेदरम्यान कारल्याचे सेवन आई आणि बाळ दोघांच्या आरोग्यासाठी एक उत्तम विकल्प साबीत होऊ शकते. कारल्यात फायबर, कॅल्शियम, पोटॅशियम, बीटा-केरोटिन आणि आयट्री फायबर असत जे गर्भात वाढणारे बाळ आणि आई दोघांच्या आरोग्यासाठी फायदेशीर असत.



**फायबरचे प्रमाण जास्त असतात** : कारल्यात फायबर उच्च मात्रेत असत ज्यामुळे भूक लवकर लागत नाही. हे हाय कॅलोरी फूड्स आणि जंक फूड्सच्या क्रेविंग्सला कमी करतो. त्याशिवाय हे प्रेग्नेंसीदरम्यान तुम्हाला लठ्ठ होण्यापासून देखील तुमचा बचाव करतो.

**टीऑक्सीडेंट असतो** : कारल्यात व्हिटॅमिन सी असत, जे एंटीऑक्सीडेंट असून गर्भवती महिलांना हानिकारक बॅक्टेरियापासून लढण्याची शक्ती देत. हे गर्भवती महिलांच्या रोगप्रतिकारकला देखील वाढवण्यास मदत करतो आणि रोगप्रतिकारक सिस्टमला बूस्ट करतो.

**बॉवेल मुव्हमेंटला योग्य ठेवतो** : कारले पेरिस्टालिसिसला बूस्ट देण्यास देखील मदत करतो जे नंतर बॉवेल हालचालला नियंत्रित करणे आणि गर्भवती महिलांच्या पचन तंत्राला योग्य करण्यात मदत करतो. कारले पचन तंत्राशी निगडित इतर समस्यांमध्ये देखील आराम देण्यास मदत करतो.

**फोलेट उच्च प्रमाणात असतो** : गर्भवती महिलांसाठी फोलेटची आवश्यकता असते. हे मिनरल्स संभावित न्यूरल ट्यूब डिफेक्टला सुरक्षित ठेवण्यास मदत करतो. कारल्यात फोलेटची मात्रा फार जास्त असते. यामुळे गर्भवती महिलांमध्ये या मिनरल्सच्या दैनिक आवश्यकतेचे एक चतुर्थांश भाग आहे.

**अभ्रकाचा विकास करतो** : कारल्यात काही खास प्रकारचे व्हिटॅमिन्स आणि मिनिरल्सचा एक मोठा स्त्रोत असतो. यात आयरन, नियासिन, पोटॅशियम, पेंटोथेनिक ॲसिड, जिंक, पाइरोडॉक्सिन, मॅग्नीशियम आणि मँगनीज सामील आहे. याला म्हणून आपण सुपर भाजी म्हणू शकतो कारण हे भ्रूणच्या विकासात एक महत्त्वाची भूमिका बजावतो.



## कैरी-दुधीचा मुरांबा


**साहित्य:** दुधी भोपळ्याचा कीस ३ वाट्या, कैरीचा कीस १/२ वाटी, साखर ३-१/२ वाट्या, वेलची पूड २ चमचे, केशरकाड्या १/२ चमचा.

**कृती:** प्रथम दुधी भोपळा व कैरी वेगवेगळे किसून घेऊन नंतर एकत्र करणे व त्यात साखर घालून १० मिनिटे तसेच ठेवणे, साखर हळूहळू विरघळू लागेल नंतर गॅसवर ठेवून उकळणे. साधारण एकतारी झाला असे वाटले की गॅस बंद करून त्यात केशर व वेलची पूड एकत्र करून थंड झाल्यावर बाटलीत भरणे. पारदर्शक असा हा मुरांबा दुधी भोपळा प्रकृतीने थंड असल्यामुळे उन्हाळ्यात अतिशय उत्तम.

---

# फोन 'स्वस्त' पण फोटो येतील 'मस्त', फक्त 'या' सोप्या टीप्स करा फॉलो!

तुमच्याकडे कोणत्याही प्रकारचा स्मार्टफोन असेल भलेही स्वस्त किंमतीचाही असेल पण तरीही जर तुम्हाला फोटोग्राफीच्या खास ट्रीक्स माहित असतील तर तुमच्या फोनमधील फोटो अगदी बेस्टच येतील. आजकाल डिजीटल कॅमेरा फार कमी लोक वापरतात. प्रोफेशनल लोक सोडले तर इतर सर्वजण मोबाईल फोनच्या कॅमेऱ्यानेच सर्व फोटोग्राफी करतात. पूर्वी घरातील फंक्शन्स किंवा पिकनिकला कॅमेरा वापरला जायचा पण आजकाल सर्वत्र मोबाईल फोनच्या कॅमेऱ्यानेच काम होतं, पण त्यामुळे फोनमधून फोटोही तसेच यावे असं वाटत असतं. पण अनेकांकडे बजेटच्या इश्यूमुळे स्वस्तातले



फोन असतात, त्यांना वाटतं की फोन स्वस्त असल्यामुळे फोटो चांगले येणार नाहीत. पण मूळात तुमच्याकडे १०-२० हजारांचा फोन असेल तरी तुम्ही भारी फोटो काढू शकता, त्यासाठी सोप्या काही टीप्स तुम्हाला फॉलो कराव्या लागतील... त्याच टीप्सबद्दल जाणून घेऊ...

फ्रेमः तुम्ही कोणत्याही वस्तूचा किंवा व्यक्तीचा फोटो घेत असाल तर तो पूर्णपणे फ्रेममध्ये ठेवा. म्हणजेच, वस्तू फ्रेममध्ये योग्यरित्या आली पाहिजे, कॅमेरा ते ऑब्जेक्टपर्यंतचं अंतरही नेमकं हवं. प्रकाशः चांगला फोटो काढण्यासाठी तुम्हाला योग्य लाईट म्हणजेच प्रकाशाची काळजी घेणंही आवश्यक आहे. योग्य लाईट नसेल तर फोटो डार्क येऊ शकतो,तसंच अतिप्रकाशातही फोटो बरोबर येणार नाही योग्य लाईट फार महत्त्वाची असते.

दोन्ही हातांचा करा वापरः चांगला फोटो काढण्यासाठी नेहमी दोन हात वापरा जेणेकरून तुमची फोनवरील पकड चांगली होईल आणि तुम्ही ऑब्जेक्ट आरामात कॅप्चर करू शकता.

झूमः फोटो घेण्यासाठी झूम या फीचरचा जपून वापर करा. आवश्यक असल्यासच कॅमेरा झूम करा किंवा फिजीकली तुम्ही फोटो काढणाऱ्या व्यक्ती किंवा गोष्टीच्या जवळ जा, ज्यामुळे फोटो फाटणार नाही.

तसेच स्मार्टफोनमध्ये उपलब्ध असलेले वेगवेगळे मोड वापरुनही तुम्ही आपोआप फोटो अधिक चांगले काढू शकता. आजकाल मोबाईल फोनमध्ये पोर्ट्रेट, नाईट, प्रो आणि स्लो-मो असे अनेक पर्याय आहेत, ज्याच्या मदतीने तुम्ही चांगले फोटो काढू शकता.

---

# जवस रोजच्या जीवनात फायदेशीर

**जवसचा** वापर रोजच्या आहारात करणे महत्त्वाचे आहे. भाकरीबरोबर जवस किंवा अळशीची चटणी हा मेनू खास ग्रामीण असला तरी जवसाचं महत्त्व सगळ्यांना कळायला लागलं आहे. जवसच्या नियमीत सेवनाने रक्तातील साखर, ट्रायग्लिसराईड्स, हिमोग्लोबिन आणि कोलेस्टेरॉल आटोक्यात राहू शकतात. स्त्रियांच्या बाबतीत हॉर्मोन्सची पातळी योग्य ठेवण्यासाठी जवसाचा उपयोग होतो.



- हिरड्या मजबूत करण्यासाठी आणि दात दुखत असल्यास त्यावर जवसचे तेल फायदेशीर ठरते.
- जवसाचं पीठ घेऊन त्याने छाती शेकली तर कफ पातळ होऊन तो बाहेर पडण्यास मदत होते. यामुळे तापाचे प्रमाण देखील कमी होईल.
- पाठ दुखत असेल तर दुखणाऱ्या जागी जवस बांधून ठेवावे.
- एखाद्या ठिकाणी भाजलं असेल तर त्या ठिकाणी जवसचं तेल आणि चुन्याची निवळी एकत्र करुन बांधावी. यामुळे जखम लवकर बरी होते.

आहारात जवसाचा वापर केल्यास भूक वाढते आणि पचनक्रिया देखील चांगली राहते.

---



# पाण्यात पाय बुडवून ठेवण्याचे फायदे

**मॉलमध्ये** किंवा मार्केटमध्ये फिरायला तर सर्वांना आवडतं, पण तिथून आल्यावर जो थकवा येतो त्याने अगदी काही काम नको नकोसं वाटतं. पण असा थकवा आपण काही वेळातच दूर करू शकता. त्यासाठी हे करा

- एका टबमध्ये कोमट पाण्यात थोडंसं मीठ घालून आपले दोन्ही पाय बुडवा. याने थकवा दूर होतो आणि चालताना सूज आली असल्यास त्यावरही राहत मिळते.
- ज्या लोकांना रात्री झोप न येण्याची तक्रार असते त्यांनी हा प्रयोग नक्की अमलात आणावा. झोपण्यापूर्वी कोमट पाण्यात १५ ते २० मिनिटे पाय बुडून ठेवावे.
- याने रक्तप्रवाह सुरळीत होतो.
- जे लोक रात्रभर एकाच कुशीवर झोपतात, त्याने सकाळी उठून हा प्रयोग करावा. याने दिवसभर फ्रेश जाणवेल.
- या प्रयोगाने किडनीची एनर्जी वाढते.
- संधिवाताची तक्रार असलेल्या लोकांनी पाण्यात दालचिनी आणि काळे मिरे टाकून पाय पाण्यात ठेवावे.
- हा प्रयोग जेवण झाल्यावर करणे योग्य ठरेल.
- लो ब्लड प्रेशरची तक्रार असलेल्यांनी गरम पाण्यात पाय ठेवून बसू नये. मधुमेही रुग्णांनी पण हा प्रयोग करू नये.

---

# चमकदार दातांसाठी झोपण्याच्या वेळेस करा ही कामे

- नारळाचे तेल ऑरगॅनिक आणि नॅच्युरल टीथ व्हाईटनर आहे. नारळाच्या तेलाने तुम्ही तुमचे दात चमकवू शकता. यासाठी थोडेसे नारळाचे तेल घेऊन १५ मिनिटे तोंडात ठेवा. त्यानंतर साध्या पाण्याने चूळ भरा. यामुळे फायदा होईल.
- दात चमकवण्यासाठी सोपा उपाय म्हणजे स्ट्रॉबेरीज. स्ट्रॉबेरीच्या गरात चिमूटभर बेकिंग सोडा मिसळा. हे मिश्रण ब्रशवर घेऊन दात घासा. यामुळे दातांवरील पिवळेपणा दूर होईल.




- ॲपल सिडर व्हिनेगरही दात चमकावण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. याचे काही थेंब दातांवर चोळा. अधिक फायद्यासाठी सकाळी ब्रश करण्याआधी या व्हिनेगरने दात चोळा.

---

# टॅटू काढून टाकण्यापूर्वी या गोष्टींकडे अवश्य लक्ष द्या!

**उत्साहाच्या भरात अनेकदा अंगावर वेगवेगळ्या ठिकाणी टॅटू काढले जातात. काहीजण आपल्या साथीदाराचे नाव टॅटूमध्ये बनवतात. पण कालांतराने नात्यात दुरावा आल्यानंतर तेच नाव नकोसे वाटते. अशावेळेस टॅटू काढून टाकण्यासाठी नेमके काय करावे? ही प्रक्रिया त्रासदायक असते का? याबाबतचा खास सल्ला डर्मेटोलॉजिस्ट डॉ. के. खतुजा यांनी दिला आहे.**



**टॅटू क्रीम परिणामकारक नसतात**

टॅटू निघून जाण्यासाठी क्रीम्स किंवा बाम यांचा वापर करण फायदेशीर नाही. कोणत्याच घरगुती उपायांनी किंवा क्रीम लावल्याने टॅटूपासून सुटका मिळत नाही.

**लाल किंवा पिवळ्या रंगाचे टॅटू कायमचे जाणे कठीण आहे**

प्रत्येक रंग शोषून घेण्यासाठी काही विशिष्ट वेव्हलेंग्थ काम करतात. त्यामुळे एकाच वेव्हलेंग्थमुळे सारेच रंग जाणे कठीण असते. अनेकजण काळे आणि निळे घालवणारे लेझर वापरतात. त्याचाच वापर करून लाल किंवा पिवळा रंग जाणे मुश्कील आहे.

**लेझर त्रासदायक ठरत नाहीत**

लेझर ट्रीटमेंटपूर्वी त्वचेवर काही सोल्युशन लावून तेथील भागातील संवेदनशीलता कमी केली जाते. त्यामुळे काही सेकंद तुम्हाला त्रास जाणवतो. लेझर किरणांमुळे वातावरणातील उष्णता अधिक वाढते. म्हणूनच उपचारांदरम्यान आयवेअर दिली जातात. म्हणजे तुम्हाला काहीच दिसत नाही.

**हात, पाय, घोट्यावरील टॅटू काढणे कठीण आहे**

लोअर बॅकच्या भागापेक्षा बोटाच्या सांध्याजवळील टॅटू काढणे कठीण असते. शरीरात रक्तवाहिन्यांजवळील भागातील टॅटू काढणे अधिक सुकर आहे. पाय, घोटा किंवा हात या भागावरील टॅटू काढणे कठीण आहे.

**अनेक लेझर सेशन्स लागतात**

टॅटू पूर्णपणे काढून टाकण्यासाठी सुमारे १०-१५ सेशन्स लागतात. त्वचेला पुन्हा पूर्ववत होण्यासाठीदेखील वेळ द्यावा लागतो.

**टॅटूच्या खुणा राहतात**

टॅटू पूर्णपणे काढला तरीही त्याच्या थोड्याफार खुणा राहतात. टॅटू काढला तरीही तो कोणत्या भागावर होता हे तुमचे मित्र नक्कीच ओळखू शकतात.

**लेझर ट्रीटमेंटदरम्यान बर्निंग स्मेल येतो**

टॅटू काढताना तुम्हाला काही जाणवत नसले तरीही वास येतो. यादरम्यान त्वचेवर लेझरची किरणे जेव्हा त्वचेत जातात तेव्हा laser plume घटक वातावरणात मिसळल्यानंतर बर्निंग स्मेल येतो.

**काही काळ दुर्गंधीचा त्रास होईल**

स्कार/डाग पडू नये, त्वचा पूर्ववत व्हावी याकरिता काही जेलचा वापर करा. पण ॲनस्थेशियाचा प्रभाव जसा कमी होतो तसा काही दिवस त्रास जाणवतो.

---

# चेहऱ्यावर पुन्हा त्याच जागी पिंपल का येतो?

**पिंपलचा** त्रास टाळण्यासाठी घरगुती उपाय, उत्तम फेसवॉश वापरणे यासारखे सारे खटाटोप करता. परंतु, अनेकांमध्ये विशिष्ट काळानंतर पुन्हा त्याच जागी पिंपल येण्याची समस्या आढळून येते. पिंपल्सचे चेहऱ्यावर त्याच त्याच जागी पुन्हा येणे यामागील नेमके काय याबद्दलचा खास सल्ला डर्मेटोलॉजिस्ट डॉ. सेजल शहा यांनी दिला आहे. त्वचेच्या खाली वाढणारे पिंपल्स अनेकदा त्वचेवर दिसत नाहीत. त्वचेवरील छिद्रांमधून जेव्हा तेल बाहेर पडण्याची प्रक्रिया वाढते तेव्हा सूजही वाढते. त्वचेच्या खाली तेलामुळे गोलाकार फुगवटा निर्माण होतो. त्याचे प्रमाण तेलावर अवलंबून असते. तसेच तुम्हाला सतत चेहऱ्याला हात लावण्याची सवय असेल तर पुन्हा त्याच जागी ॲक्ने वाढण्याचा धोका अधिक असतो. सतत चेहऱ्याला हात लावण्याच्या सवयीमुळे चेहऱ्यावरील मळ, तेल पुन्हा छिद्रांमध्ये ढकलला जातो. यामुळे पिंपल्सची वाढ अधिक प्रमाणात होते.



**पिंपलचा त्रास कमी करण्यासाठी काय कराल ?**

पिंपलमध्ये पस निर्माण झालेला असल्यास त्याला फोडण्याचा मोह टाळा. त्याला सतत हात लावू नका. ते आपोआपच कमी होण्यासाठी थोडा वेळ द्या. किंवा डर्मेटोलॉजिस्टचा सल्ला घ्या. अनेकदा पिंपल फोडल्यानंतरही त्यातील सारा पांढरा भाग/पस बाहेर पडत नाही. त्यामुळे पुन्हा त्याजागी पिंपल वाढण्याची शक्यता निर्माण होते. म्हणूनच चेहरा पूर्णपणे स्वच्छ करण्यासाठी salicylic acid युक्त फेसवॉशचा वापर करा. यामुळे अतिरिक्त तेल काढण्यास मदत होते. benzoyl peroxide चा समावेश असलेल्या उत्पादनांची निवड केल्यास त्वचेवर वाढणारे आणि ॲक्नेच्या निर्मितीला कारणीभूत ठरणाऱ्या बॅक्टेरियांचा प्रभाव कमी करण्यास मदत होते.

---

# किरकोळ आजारांकडे दुर्लक्ष नको

**आपल्या दैनंदिन जीवनमानात अगदी किरकोळ आजार हे कधीकधी दुर्लक्षिले जातात, मात्र त्याचा त्रास जाणवू लागला की त्यानंतर डॉक्टरकडे धाव घेतली जाते. मात्र अगदी किरकोळ वाटणारे दुखणे हे एखाद्या आजाराचे कारण आहे असे समजले की मग मनात भीती निर्माण होते. शिवाय त्या आजाराचे गंभीर परिणाम आयुष्याची चिंता, खर्च आदी गोष्टींचे टेन्शन निर्माण होऊन मग वेळीच इलाज केला असता, तर बरे झाले असते असे वाटून जाते. यावेळी अगदी किरकोळ म्हणून वाटणारे दुखणे हे एखाद्या गंभीर आजाराचे लक्षण आहे, असे वाटले तर त्यावर वेळीच इलाजही केला जाऊ शकतो.**

**पित्त :** आपल्याला नियमित काही खाल्ले तर त्याचा त्रास होतो. खाल्लेले पचत नाही, किंवा भूकच लागत नाही. छातीत जळजळ, तेलकट किंवा दुपारच्या जेवणाव्यतिरिक्तही काही खाल्ले तरी ते पचत नाही, म्हणून मग ते किरकोळ पित्तावर ढकलले जाते. पण मग त्याचा अति त्रास झाला की, मग डॉक्टरकडे जाण्यावाचून पर्याय उरत नाही. पित्तामुळे काही खाणे होत नाही. यामुळे एकप्रकारची त्रस्तता दिसून येते. मात्र यावर वेळीच इलाज न केल्यास याचा परिणाम पित्ताचे खडे होणे आदीसारख्या समस्या निर्माण होण्याकडे दिसून येतो. मग पित्ताचे खडे काढण्यासाठी ऑपरेशन केली जातात.



**पोटदुखी :** पोटदुखीसारख्या वारंवार उद्भवणाऱ्या आजाराकडे बरेचदा दुर्लक्ष केले जाते. काही घरगुती उपाय करून किंवा अशा दुखण्यांकडे दुर्लक्ष करून ती किरकोळ म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले जाते. मात्र मासिक पाळीच्या वेळी पोटात दुखणे, किंवा इतरवेळी वारंवार पोटात दुखणे हे नेहमीचेच म्हणूनही त्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही. एका उदाहरणामध्ये एका महिलेच्या वारंवार पोटात दुखण्याच्या तक्रारीमुळे काही घरगुती इलाज केल्यानंतरही काही गुण नाही म्हणून मग डॉक्टरी उपाय करण्याचे ठरले. स्टोनमुळे पोटात दुखत असावे असा अंदाज करून डॉक्टरनेही त्यावरील औषधे सुरू केली. काही पथ्ये सांगून औषधांना खर्चदेखील झाला. मात्र, तरीदेखील हे दुखणे सुरूच राहिल्याने शेवटी तज्ञांकडून तपासणी केली असता, गंभीर आजाराचे निदान झाले आणि हेच वारंवार दुर्लक्षिले गेलेले दुखणे आयुष्याची चिंता भेडसावणारे ठरले.

**डोकेदुखी :** अगदी कोवळ्या वयाची मुले आपले डोके दुखते म्हणून अगदी डोके धरून बसतात. यावेळी लहान मुलांना चष्मा लागणे स्वाभाविक आहे म्हणून त्यांना चष्मा असावा असा अंदाज करून डोकेदुखीच्या आजाराकडे बरेचदा दुर्लक्ष केले जाते. शालेय जीवनात अशा तक्रारी वारंवार उद्भवताना दिसून येतात. चक्कर येणे, डोके दुखणे अशा आजाराकडे दुर्लक्ष करण्यापेक्षा लहान मुलांची काळजी घेणे आवश्यक आहे.

# वसई विरार पालिकेच्या अर्थसंकल्पात विशेष तरतूद

■ बातमी /लेख,
प्रीती दिपक नाईक

वसई-विरार शहर महानगरपालिकेचे २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचे अंदाजपत्रक सादर करण्यात आले असून शहराच्या विकासासाठी विविध नाविन्यपूर्ण योजना राबविण्यावर भर देण्यात आला आहे. पालिकेचे आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांनी स्थायी समिती आणि स्थायी समिती सभापती प्रवीण शेट्टी यांच्या उपस्थितीत हे अंदाजपत्रक सादर केले. या अर्थसंकल्पात केळीचे गाव, मच्छीमारांचे गाव, रांगोळीचे गाव, फुलांचे गाव अशा नाविन्यपूर्ण संकल्पना मांडण्यात आल्या आहेत. यंदाचा पालिकेचा अर्थसंकल्प तब्बल ४२०८ कोटी रुपयांचा असून या अर्थसंकल्पात गावांच्या उपक्रमांसाठी ६.५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

या अर्थसंकल्पात विशेष म्हणजे ग्रामीण भागाचा विकास आणि स्थानिक संस्कृती, कला व व्यवसायांना चालना देण्यासाठी गावांची संकल्पना मांडण्यात आली आहे. विविध गावांच्या वैशिष्ट्यांवर आधारित प्रकल्प उभारून पर्यटन वाढविणे, स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देणे आणि पारंपरिक वारसा जपणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.

**केळीचे गाव- नंदखाल**

वसई-विरार परिसरातील शेतकऱ्यांना केळी उत्पादनात प्रोत्साहन देण्यासाठी नंदाखाल येथे ''केळीचे गाव' ही संकल्पना राबविण्याचा प्रस्ताव अर्थसंकल्पात मांडण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत केळी प्रक्रिया केंद्र, प्रशिक्षण केंद्र, प्रदर्शन तसेच विक्रीसाठी स्वतंत्र सुविधा उभारण्यात येणार आहेत. या



योजनेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात १.५ कोटींची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**मच्छिमारांचे गाव- सांडोर**

समुद्रकिनारी असलेल्या सांडोर भागातील पारंपारिक मच्छीमार संस्कृती जपण्यासाठी ''मच्छिमारांचे गाव'' हा विशेष प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पांतर्गत पारंपारिक नौका, मासेमारीसाठी वापरली जाणारी जाळी, साधने आणि मच्छीमारांच्या जीवनशैलीचे प्रदर्शन पर्यटकांसाठी उपलब्ध करून दिले जाईल. या उपक्रमामुळे पर्यटन वाढीस चालना मिळेल तसेच स्थानिकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील. या प्रकल्पासाठी २.५० कोटींची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**रांगोळीचे गाव- जुचंद्र**

भारतीय पारंपारिक कलेचा वारसा जपण्यासाठी जुचंद्र येथे ''रांगोळीचे गाव'' हा उपक्रम राबविण्याचा प्रस्ताव अर्थसंकल्पात आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून स्थानिक कलाकारांना त्यांच्या कलेचे प्रदर्शन करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाईल. रांगोळी प्रदर्शन, प्रशिक्षण कार्यशाळा, स्पर्धा तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून या कलेला प्रोत्साहन देण्यात येईल. या yojnesathi १.५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

**फुलांचे गाव**

वसई-विरार परिसरातील अनुकूल हवामानाचा फायदा घेत फुलशेतीला चालना देण्यासाठी ''फुलांचे गाव'' ही संकल्पना देखील प्रस्तावित करण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत प्रशिक्षण व प्रदर्शन केंद्र उभारून शेतकऱ्यांना आधुनिक फुलशेती तंत्रज्ञान, लागवड पद्धती, उत्पादन व्यवस्थापन आणि बाजारपेठेबाबत मार्गदर्शन दिले जाणार आहे. या योजनेसाठी महापालिकेच्या अंदाजपत्रकात १ कोटींची तरतूद आहे.

**शहर विकासाला नवे रूप**

महापालिकेच्या या अर्थसंकल्पात पर्यटन, कृषी विकास, स्थानिक कला संवर्धन आणि रोजगार निर्मिती यावर विशेष भर देण्यात आला आहे. शहरातील विविध भागांच्या वैशिष्ट्यांवर आधारित विकास प्रकल्प उभारून वसई-विरार शहराला एक वेगळी ओळख मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. आगामी काळात या प्रकल्पाची अंमलबजावणी झाल्यास वसई-विरार शहर पर्यटन, शेती आणि सांस्कृतिक वारसा या क्षेत्रांमध्ये एक नवे केंद्र म्हणून विकसित होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## मालमत्ता कर थकबाकीदारांना दिलासा!

■पालघर। प्रतिनिधी,

पालघर नगर परिषद क्षेत्रातील मालमत्ता कर थकबाकीदारांना मोठा दिलासा देणारा निर्णय पालघर नगरपरिषदेकडून घेण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार पालघर नगरपरिषदेकडून अभय योजना जाहीर करण्यात आली असून या योजनेअंतर्गत थकीत मालमत्ता करावरील शास्तीत सवलत देण्यात येणार आहे.

नगरपरिषद प्रशासनाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, १९ मे २०२५ पर्यंत थकीत असलेल्या मालमत्ता करावरील शास्तीपैकी ५० टक्के शास्ती माफ करण्यात येणार आहे. मात्र या सवलतीचा लाभ घेण्यासाठी संबंधित मालमत्ता धारकांनी शास्ती वगळता उर्वरित संपूर्ण थकीत कर एकरकमी स्वरूपात भरणे आवश्यक राहणार आहे.

ही अभय योजना ३१ मार्च



२०२६ पर्यंत लागू राहणार असून पालघर नगर परिषद क्षेत्रातील मालमत्ता धारकांनी या योजनेचा लाभ घेऊन आपला थकीत मालमत्ता कर भरावा, असे आवाहन नगरपरिषद प्रशासनाने केले आहे. या योजनेमुळे नागरिकांना आर्थिक दिलासा मिळण्याबरोबरच नगरपरिषदेच्या थकीत महसूल वसुलीला गती मिळणार असल्याचेही सांगण्यात आले आहे.नगराध्यक्ष उत्तम मोरेश्वर घरत, उपनगराध्यक्ष राजेंद्र पाटील तसेच मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव यांनी पालघर शहरातील नागरिकांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा आणि नगरपरिषदेच्या विकासकामांना सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

# अश्लील व्हिडिओ दाखवून विद्यार्थिनींशी चाळे... गावातील महिलांनी शिक्षकाला चपलेने बदडले

■भंडारा। प्रतिनिधी,

विद्यामंदिर संबोधल्या जाणाऱ्या शाळेतच चक्क लैंगिक विकृतीचा काळोख पसरविणाऱ्या एका नराधम शिक्षकाला संतप्त ग्रामस्थांनी चपलेने बदडून पोलिसांच्या स्वाधीन केले. शिक्षकी पेशाला काळीमा फासणारी ही धक्कादायक घटना भंडारा जिल्ह्यातील पवनी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या वडेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मंगळवारी उघडकीस आली.

हा प्रकार लक्षात येताच संतप्त गावकरी आणि महिलांनी

**महिलांनी चपलेने मारले**

अनिल जगन राठोड (५४) असे या आरोपी शिक्षकाचे नाव आहे. पाच वर्षांपूर्वीच तो या शाळेत बदलून आला होता. वर्ग सुरू झाल्यावर विद्यार्थ्यांना बाहेर काढून तो विद्यार्थिनींना अश्लील व्हिडिओ दाखवायचा. एवढेच नाही तर, त्यांच्यासोबत वर्गात विकृत चाळेही करायचा. हा प्रकार वाढल्यावर काही विद्यार्थिनींनी पालकांना माहिती दिली. ही वार्ता गावभर पसरताच संतप्त पालकांनी शाळेकडे धाव घेतली. काही महिलांनी त्याला शाळेबाहेर काढून या प्रकाराबद्दल विचारणा केली. मात्र तो उडवाउडवीची उत्तरे देत असल्याचे पाहून महिलांचा पारा भडकला. त्यांनी पकडून चपलांनी बदडून काढले. संतप्त गावकऱ्यांनी आणि पालकांनीही त्याला या कृत्याचा जाब विचारला. त्यानंतर त्याला पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.



त्याला भर चौकात चपलेने बदडून काढले. त्या शिक्षकाला पोलिसांना स्वाधीन करून तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी त्या आरोपी शिक्षकावर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आले आहे. शिक्षक सध्या पोलिसांच्या ताब्यात आहे.

**तक्रारीत गंभीर अन् धक्कादायक आरोप**

या शिक्षकाविरुद्ध पोलिसात दाखल करण्यात आलेल्या तक्रारीमध्ये अत्यंत धक्कादायक आणि गंभीर आरोप करण्यात आले आहेत. वगार्तील मुलांना वगार्बाहेर काढून तो मुलींसह दार बंद करून आत असायचा. अश्लील व्हिडिओ दाखवून नको ते कृत्य करायचा. मागील जुलै महिन्यापासून त्याचा हा प्रकार सुरू होता. नापास करण्याची आणि घरी सांगितल्यास मारण्याची व शाळेतून काढण्याची धमकी देऊन तो हे प्रकार करायचा.

**पॉक्सो अंतर्गत गुन्हा**

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ कारवाई करत संबंधित शिक्षकाला ताब्यात घेतले आहे. आरोपी शिक्षकाविरुद्ध पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला असून, पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# पुजाराच्या पत्नीचं शेजारच्या ट्रक ड्रायव्हरशी अफेअर
## अडथळा ठरणाऱ्या पुजाऱ्याचा केला मर्डर, अंत्यविधीला आरोपींची हजेरी

■मुंबई। प्रतिनिधी,

शेजारच्या ट्रक ड्रायव्हरसोबत असलेल्या प्रेम संबंधात अडथळा ठरत असलेल्या पुजारी पतीची त्याच्या पत्नीनेच हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी बुधवारी त्याची पत्नी, तिचा प्रियकर आणि इतर दोघांना अटक केली आहे. सिद्धलिंगप्पा एम. एस. असे मृत पुजाऱ्याचे नाव असून, ते 6 मार्चपासून बेपत्ता होते. 7 मार्च रोजी त्यांचा मृतदेह सापडल्यानंतर पोलिसांनी तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास केला असता, ही हत्या त्यांच्याच पत्न ीने प्रियकराच्या मदतीने घडवून आणल्याचे उघड झाले. शालिनी (32), एम. सी. हरीश (33), संतोष कुमार (29) आणि गणेश (29) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. ही घटना कर्नाटकातील मंड्या जिल्ह्यात घडली.

अधिकची माहिती अशी की, घटनेच्या दिवशी म्हणजे 6 मार्च रोजी दुपारी 3 च्या सुमारास सिद्धलिंगप्पा गणपती मंदिरात पूजेसाठी घराबाहेर पडले होते. संध्याकाळी 4 वाजता त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी 10-15 मिनिटांत घरी पोहोचतो असे सांगितले. मात्र, रात्री उशिरापर्यंत



ते न परतल्याने शोधमोहीम सुरू झाली. चिक देवरया सागर कालव्याजवळ त्यांच्या चपला, रक्ताचे डाग आणि पूजेचे साहित्य विखुरलेले आढळले, तर त्यांची दुचाकी पाण्यात बुडवलेली होती. या संशयास्पद बाबींमुळे नातेवाईकांनी तक्रार दाखल केली आणि पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम 103 (1) व 238 नुसार गुन्हा नोंदवला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी शालिनीचे तिचे शेजारी राहणाऱ्या हरीश नावाच्या ट्रक ड्रायव्हरशी प्रेमसंबंध होते. वर्षभरापूर्वी सिद्धलिंगप्पा यांना या प्रकरणाची माहिती मिळाली होती, त्यावरून पती-पत्नीमध्ये सतत वाद होत होते. महिनाभरापूर्वी हे भांडण विकोपाला गेल्याने शालिनीने पतीचा काटा काढण्याचा निर्णय घेतला. 6 मार्च रोजी सिद्धलिंगप्पा यांचा उपवास असल्याचे आणि त्यांच्यात प्रतिकार करण्याची शक्ती कमी असल्याचे शालिनीने हरीशला कळवले. त्यानुसार, हरीश आणि त्याच्या साथीदारांनी कालव्याच्या पुलावर सिद्धलिंगप्पा यांच्या डोक्यात जड वस्तूने प्रहार करून त्यांची हत्या केली आणि पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह व दुचाकी पाण्यात फेकून दिली.

स्वतःवरचा संशय टाळण्यासाठी हे सर्व आरोपी सिद्धलिंगप्पा यांच्या अंत्यविधीलाही उपस्थित राहिले होते. ही घटना निव्वळ अपघाती मृत्यू असल्याचे भासवण्याचा त्यांचा प्रयत्न होता. मात्र, पोलिसांनी तांत्रिक पुरावे आणि गुप्त माहितीच्या आधारे संशयितांची कसून चौकशी केली असता त्यांनी आपला गुन्हा कबूल केला. पोलिसांनी या चौघांनाही न्यायाधीशांसमोर हजर केले असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे.

# पॅरोलवर बाहेर आला अन् भररस्त्यात बायकोवर केला गोळीबार... बायकोवर कशाचा राग होता?

■मुंबई। प्रतिनिधी,

एका नवऱ्याने आपल्या बायकोवर तब्बल सात गोळ्या झाडून तिची हत्या केली आहे. धक्कादायक म्हणजे आरोपी पती तुरुंगातून पॅरोलवर बाहेर आला होता. बाहेर आल्यानंतर त्याने आपल्या पत्नीची हत्या केली आहे. भररस्त्यातच आरोपीने आपल्या पत्नीवर गोळ्या झाडल्या. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. अंजली असं मृत पत्नीचं नाव आहे. उत्तर प्रदेशातील बिरधाना परिसरातील ही घटना नेमकी काय आहे, जाणून घेऊया.

**पॅरोलवर आला बाहेर**

संजय असं या आरोपीचं नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पती-पत्नीमधील वादातून संजयने भररस्त्यात अंजलीवर गोळ्या झाडल्या आणि तो घटनास्थळावरून



**पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह**

अंजलीचे पार्थिव अंत्यसंस्कारासाठी बिरधाना गावात नेण्यात आले असून, संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. पॅरोलवर बाहेर आलेल्या गुन्हेगाराने पुन्हा अशा प्रकारचे कृत्य केल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. आरोपीला लवकरात लवकर अटक करून कडक शिक्षा देण्यात येईल, असे आश्वासन पोलीस प्रशासनाकडून देण्यात आले आहे. या घटनेमुळे पॅरोलवर बाहेर येणाऱ्या गुन्हेगारांच्या दहशतीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

फरार झाला. विशेष म्हणजे, आरोपी संजय हा सराईत गुन्हेगार असून तो यापूर्वीच एका हत्येच्या गुन्ह्यात तुरुंगात होता. मागील होळीच्या वेळी त्याने दुजाना परिसरात एकाची हत्या केली होती. सध्या तो पॅरोलवर बाहेर आला होता आणि याच काळात त्याने आपल्या पत्नीचाही काटा काढला.

**मृत महिलेच्या कुटुंबियांना सुरक्षा**

पोलीस प्रशासनाने या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने तपास चक्रांना वेग दिला आहे. मंगळवारी डॉक्टरांच्या विशेष पथकाने पोस्ट मार्टम प्रक्रिया पूर्ण केली. खबरदारीचा उपाय म्हणून पोलिसांनी अंजलीच्या नातेवाईकांना सुरक्षा पुरवली आहे. तपास अधिकारी एसआय जयपान सिंह यांनी सांगितले की, अंजलीचे मामा हिम्मत सिंह यांच्या तक्रारीवरून आरोपी संजय विरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याच्या शोधासाठी ठिकठिकाणी पथके रवाना करण्यात आली आहेत.

# बलात्कार पीडितेकडे गावाला मटण अन् दारुची पार्टी देण्याची मागणी... पंचायतीचा अजब निर्णय

■मुंबई। प्रतिनिधी,

एखाद्या व्यक्तीवर, कुटुंबावर किंवा समूहावर बहिष्कार टाकणे हे मूलभूत हक्कांचे उल्लंघन आहे. मात्र अनेकदा सामाजिक बहिष्काराचे प्रकार समोर येत असतात. असाच एक धक्कादायक प्रकार समोर येत आहे. एका बलात्कार पीडितेच्या कुटुंबाला न्याय मिळण्याऐवजी ग्रामपंचायतीने सामाजिक दंड सुनावल्याचा गंभीर आरोप होत आहे. छत्तीसगडच्या बलरामपूर जिल्ह्यातील ही घटना आहे. एका महिलेवर अत्याचार करण्यात आला, ज्यामुळे ती सध्या गरोदर असल्याचे समजते. पीडितेच्या कुटुंबीयांनी जेव्हा आरोपीविरुद्ध पोलिसात तक्रार करून एफआयआर दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली, तेव्हा गावात पंचायत बोलावण्यात आली. या पंचायतीमध्ये गावाच्या सरपंचाने पीडितेच्या संपूर्ण कुटुंबालाच दोषी ठरवून त्यांना 12 वर्षांसाठी समाजातून बहिष्कृत करण्याचे फर्मान काढले आहे.

**बोकड आणि दारुची मेजवानी द्यावी**

या अन्यायाची परिसीमा म्हणजे पंचायतीने पीडित कुटुंबासमोर अत्यंत अपमानजनक अटी ठेवल्या आहेत. पीडितेच्या कुटुंबीयांनी असा आरोप केला आहे की, सरपंचाने त्यांना त्यांची 'चूक' मान्य करण्यास सांगितले आहे. जर त्यांनी चूक कबूल केली, तर त्यांना शिक्षा म्हणून संपूर्ण गावच्या लोकांचे पाय धुवावे लागतील आणि त्याच पाण्याने त्यांना अंघोळ घातली जाईल. एवढेच नाही तर, दंड म्हणून संपूर्ण गावाला बोकड आणि दारूची मेजवानी देण्याची मागणीही या पंचांनी केली आहे. अशा प्रकारच्या अमानवीय अटींमुळे पीडित कुटुंब प्रचंड मानसिक दडपणाखाली आहे.

**कठोर कायदेशीर कारवाईची मागणी**

या जाचाला कंटाळून पीडितेने आणि तिच्या कुटुंबीयांनी एसडीओपी कार्यालयात धाव घेऊन लेखी तक्रार दाखल केली आहे. पीडित कुटुंबाने प्रशासनाकडे मागणी केली आहे की, केवळ बलात्काराच्या आरोपीवरच नव्हे, तर अशा प्रकारे बेकायदेशीर पंचायत भरवून शिक्षा सुनावणाऱ्या सरपंचावर आणि संबंधित गावकऱ्यांवरही कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. सध्या पोलीस या प्रकरणाचा तपास करत असून, सामाजिक बहिष्काराच्या या गंभीर प्रकारामुळे बलरामपूर जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.

**12 वर्षांसाठी सामाजिक बहिष्कार**

पीडितेच्या नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीनुसार, पंचायतीमध्ये सरपंचाने असा निर्णय घेतला की, पीडित कुटुंब पुढील 12 वर्षे कोणत्याही सामाजिक, धार्मिक किंवा सामूहिक कार्यक्रमात सहभागी होऊ शकणार नाही. या निर्णयामुळे संपूर्ण कुटुंबाला गावातील सार्वजनिक ठिकाणांपासून दूर राहण्यास सांगण्यात आले आहे. विशेष म्हणजे, पीडितेच्या तक्रारीनंतर बसंतपूर पोलिसांनी मुख्य आरोपीला आधीच अटक करून तुरुंगात धाडले आहे. मात्र, आरोपी तुरुंगात गेल्याचा राग मनात धरून सरपंचाने गावकऱ्यांसोबत बैठक घेतली आणि पीडित कुटुंबालाच गुन्हेगार ठरवून त्यांच्यावर हा सामाजिक बहिष्कार लादल्याचे समोर येत आहे.

# बॉयफ्रेंडने निर्जनस्थळी नेऊन अत्याचार करुन गेला... पीडितेच्या मदतीसाठी आलेल्या तरुणानेही अब्रू लुटली

■मुंबई। प्रतिनिधी,

ओडिशाच्या जगतसिंहपूर जिल्ह्यातून एक अंगावर काटा आणणारी घटना समोर आली आहे. एका 23 वर्षीय तरुणीवर एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या ठिकाणी बलात्कार करण्यात आला आणि त्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी तिला चार मजली इमारतीवरून खाली फेकून देण्यात आले. या हृदयद्रावक घटनेत तरुणीचा मृत्यू झाला असून, पोलिसांनी याप्रकरणी तिचा प्रियकर आणि एका अन्य नराधमाला अटक केली आहे. ही घटना 22 फेब्रुवारी रोजी घडली असून, आरोपींविरुद्ध अपहरण, बलात्कार आणि हत्येसह भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

22 फेब्रुवारीच्या सकाळी ही तरुणी आपल्या घरातून प्रियकर सोमनाथ ओझा याच्यासोबत लग्न करण्याच्या उद्देशाने बाहेर पडली होती. सोमनाथने तिला लग्नाचे आमिष दाखवून जगतसिंहपूर येथील सरला मंदिरात बोलावले होते. मात्र, तिथे पोहोचल्यानंतर त्याने लग्नाऐवजी तिला एका निर्जन स्थळी नेले. तिथे तिच्यावर अत्याचार केल्यानंतर आरोपी सोमनाथने तिला रहमा बसस्थानकावर असहाय्य



अवस्थेत सोडून तिथून पळ काढला. प्रियकरानेच घात केल्यामुळे पीडिता तासनतास बसस्थानकावर गोंधळलेल्या आणि रडत असलेल्या स्थितीत उभी होती.

तरुणीला एकटे पाहून शुभम कुमार सिंह नावाचा दुचाकीस्वार तिथे आला आणि त्याने मदतीचा बहाणा केला. सुरक्षित ठिकाणी पोहोचवण्याचे आश्वासन देऊन त्याने तरुणीला आपल्या दुचाकीवर बसवले आणि पारादीप येथील आपल्या भाड्याच्या खोलीवर नेले. पोलीस अधीक्षक अंकित कुमार वर्मा यांनी दिलेल्या माहितीनुसार, शुभमने तरुणीला इमारतीच्या छतावर नेऊन तिच्यावर पुन्हा बलात्कार केला. आपला गुन्हा उघड होऊ नये या भीतीने त्याने पीडितेचा गळा दाबण्याचा प्रयत्न केला आणि त्यानंतर तिला चार मजली इमारतीवरून खाली ढकलून दिले, ज्यात तिचा जागीच मृत्यू झाला.

दुसरीकडे, तरुणी घरी न परतल्याने तिच्या भावाने 23 फेब्रुवारी रोजी तिरतोल पोलीस ठाण्यात ती बेपत्ता असल्याची तक्रार दिली होती. त्याच दिवशी तिचा मृतदेह सापडल्यानंतर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली होती. मात्र, तपासादरम्यान सत्य समोर आल्यानंतर 25 फेब्रुवारी रोजी भावाने पारादीप मॉडेल पोलीस ठाण्यात बलात्कार आणि हत्येची लेखी तक्रार दाखल केली. पोलिसांनी तातडीने कारवाई करत दोन्ही आरोपींना बेड्या ठोकल्या असून त्यांची दुचाकी आणि मोबाईल फोन जप्त केले आहेत.

या घटनेमुळे संपूर्ण ओडिशात संतापाची लाट असून स्थानिक नागरिकांनी आरोपींना कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे. पोलिसांनी शवविच्छेदन अहवाल आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास पूर्ण केला असून, दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी पोलीस सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# शेळ्या चरायला घेऊन गेलेल्या मुलीवर झुडपात सामूहिक अत्याचार... पीडित तरुणी शेतात आढळली



■मुंबई। प्रतिनिधी,

शेळ्या चरायला घेऊन गेलेल्या मुलीवर एका झुडपात हैवानांनी लैंगिक अत्याचार केला. संबंधित घटना ही हापूरमधील धौलाना पोलीस ठाणे अंतर्गत एका गावात घडल्याचे वृत्त आहे. या घटनेनं परिसर हादरून गेल्याचे वृत्त आहे. संबंधित प्रकरणात पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी गावातील दोन तरुणांविरुद्ध

**दोन तरुणांनी तिला झुडपात नेत तिची अब्रू लुटली**

बराच वेळ झाला तरी मुलगी परतलीच नाही तेव्हा तिच्या कुटुंबीयांना काळजी वाटली असता, त्यांनी तिचा शोध सुरु केला. सायंकाळी उशिरा शोध सुरु झाला असता, ती मुलगी गावाजवळील एका शेतात अस्वस्थ अवस्थेत आढळून आली होती. कुटुंबीयांनी विचारणा केल्यानंतर पीडितेनं सांगितलं की, गावातील दोन तरुणांनी तिला झुडपात नेत तिची अब्रू लुटून घटनास्थळावरून पळ काढला होता.

गुन्हा दाखल केला आहे. ही घटना उत्तर प्रदेशातील हापूरमधील धौलाना येथे घडल्याचे सांगण्यात येत आहे.

**मुलगी तिच्या भावाला घेऊन शेळ्या चारण्यासाठी जंगलात गेली**

पीडित तरुणी ही शेतात आढळून आल्याने गावकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळल्याचे चित्र आहे. घडलेल्या घटनेनुसार, मंगळवारी दुपारी गावातील एक किशोरवयीन मुलगी तिच्या छोट्या भावाला घेऊन शेळ्या चारण्यासाठी एका दाट झाडांचा भाग असलेल्या ठिकाणी गेली होती. काही वेळाने मुलीने तिच्या धाकट्या बहिणीला शेळ्या घेऊन घरी परतण्यास सांगितले आणि ती पुढे निघून गेली होती. घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांनी मुलीला पोलीस ठाण्यात नेले आणि दोन्ही आरोपीविरुद्ध तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला. दरम्यान, पोलिसांनी सांगितले की, पीडितेची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com